# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ३०/०१/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ३०/०१/२०१० रोजी सभा सुचना क्र. १८ दि. २५/०१/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| ८) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| १२) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १३) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १४) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**मा. सभापती :-**

नमस्कार, उपस्थित असलेले सर्व स्थायी समिती सदस्य, सचिव साहेब, उपायुक्त साहेब व सर्व अधिकारी सर्वांच मी या ठिकाणी स्वागत करून सचिव साहेबांना मी विनंती करतो की, आपण सभेस सुरूवात करण्यापूर्वी मी आपल्या सर्वांना नविन वर्षाची खुशखबर भेट म्हणून आनंदाची गोष्ट तुम्हाला सांगु इच्छितो. मिरा भाईंदर महापालिकेच्या मा. महासभेमध्ये नगरसेवकांना मानधन वाढवण्याचा आपण प्रस्ताव ठेवला होता. आणि त्याचा पाठपुरावा सचिव साहेबांनी आयुक्त साहेबांनी केला. आणि जानेवारी महिन्यापासून म्हणजे चालू महिन्यापासून आपल्याला ७.५०० रू. चे नगरसेवकांना मानधन चालू झालेल आहे. हा ठराव महाराष्ट्रामध्ये फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातुन आपण मांडलेला होता. परंतु, याचा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ठरावानुसार महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेला या पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. म्हणजे आपल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या मानधनात वाढ झाली. मी आयुक्त साहेब, सचिव साहेबांना धन्यवाद देवून त्यांच अभिनंदन करतो. सचिव साहेब आपण सभेस सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ३०/०१/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १८, दि. २५/०१/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १०९, दि. २९/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सचिव साहेब, पेज नं. १३ का वाचन नही किया था । तो वह देख लेना। सचिव साहब, पिछले टाईम जब आपने अजेंडा दिया था। उसमे जो प्रकरण क्र. है १०२, १०३, १०४, १०५, १०८ है। अभी यह ९, १०, ११ आगया है।

**नगरसचिव :-**

वह रद्द हो गया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो दुसरे विषय का क्या हुआ?

**नगरसचिव :-**

पुराने विषय रद्द हो गये है। अभी नये विषय चालू है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो इतना अब खाली रहेगा।

**नगरसचिव :-**

वह मिटींग ही रद्द हुई ना ।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वही विषय बादमे आया है तो वही नंबर से विषय चालू किजीए।

**नगरसचिव :-**

मिटींग तहकुब नही हुई ना। अगर मिटींग तहकुब हुई होती तो वह नंबर आते।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो वह नंबर क्या होगा।

**नगरसचिव :-**

वह नंबर के जगह ब्लँक रहेगा।

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मागच्या बऱ्याच मिटींगमध्ये ठरल होत की, जास्तीत जास्त स्थायी समितीचे दोन जे मिनिट्स आहेत ते पेन्डींग ठेवायचे. जूनचे प्रोसिडींग आपल्याला जानेवारीमध्ये येत. किती मिटिंग यायच्या बाकी आहेत.

**नगरसचिव :-**

आता ७ मिटींगच्या मिनिट्स राहिलेल्या आहेत. पण ही पहिली होवू द्या. ७ ही मिटींग तयार आहेत. दोन-दोन देवून टाकून मोकळे होवू.

**अनिल सावंत :-**

मागे अस ठरल होत की, स्पेशल मिटींग लावा. आणि संगळ पास करून घ्या.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब कस होईल. ही जर प्रोसिडींग तुम्ही आता चालवत राहिल्या. तर आम्ही गेल्यानंतर आमची प्रोसिडींग पुढचे सदस्य येवून पास करणार.

**नगरसचिव :-**

आता ६ प्रोसिडींग आहे. आता ३-३ करून प्रोसिडींग देतो. ही अरजंट मिटींग गेली.

**अनिल सावंत :-**

सहा प्रोसिडींग एकदम द्या ना.

**नगरसचिव :-**

ठिक आहे. पूढच्या वेळेला देतो.

**अनिल सावंत :-**

जास्तीत जास्त दोन मिटींग बाकी ठेवा.

**नगरसचिव :-**

अवघे ७ प्रोसिडींग बाकी आहेत.

**अनिल सावंत :-**

ॲक्च्युली कस आहे. बी.पी.एम.सी. प्रमाणे तुमचा मागच्या...........

**नगरसचिव :-**

सगळ्या तयार आहे. एकदम पाहिजे तर मी एकदम देतो.

**मा. सभापती :-**

सर्व एकदमच घेवून या.

**मा. आयुक्त :-**

साहीच्या साही प्रोसिडींग देवून टाका.

**नगरसचिव :-**

ठिक आहे. पूढच्या मिटिंगमध्ये साही प्रोसिडींग ठेवतो.

**याकुब कुरेशी :-**

दि. २९/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अनिल सावंत :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १०९ चा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०९ :-**

दि. २९/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ९० :-**

दि. २९/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी** **अनुमोदन :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११०, त्रैमासिक जमा-खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**जुबेर ईनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आयुक्त साहेब हा विषय तुम्ही आमच्याकडे पाठवलेला आहे. माहिती. अन्न निरिक्षक २५ टक्के सुध्दा आजपर्यंत केलेल्या तरतुदीच्या जवळपास गेलेले नाही. जमाच्या बाजूला. आम्ही जुलै ते सप्टेंबर पर्यंतच आहे. त्याच्यामध्ये जमा बाजू आहे. तर २५ टक्के च्या आसपास आहोत. सप्टेंबरमध्ये.

**शरद पाटील :-**

त्याच्यामध्ये आपली मागणी काय होती? आणि वसुलीचा टारगेट काय होत ते सांगा?

**जुबेर ईनामदार :-**

जी आपण तरतुद केलेली आहे. त्याच्यात २५ टक्के सुध्दा आपण जमा करू शकलो नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही अभ्यास करून पेपरवाल्यांकडे जायला पाहिजे. अभ्यास करताना सुध्दा सगळ्या गोष्टी एकत्र येत नाही. त्यामध्ये ५२२ कोटी जे धरलेल आहे. त्यामध्ये ३०० कोटी रू. कर्ज म्हणून धरलेल आहे.

**जुबेर इनामदार :-**

मूळ तरतुदीवर बोलतो.

**मा. आयुक्त :-**

मी पण मूळ तरतुदीच्या विषयावरच बोलतो. ३०० कोटी रू. त्यामधून मायनस केले. तर महापालिकेच जे बजेट आहे. इनकम आहे तो १८० ते १८६ पर्यंत येईल. त्या मागच्या वर्षी धरलेल आहे. त्यापैकी आमच डिसेंबर अखेर पर्यंत १३० कोटी रू. पर्यंत वसुली झालेली आहे.

**जुबेर ईनामदार :-**

आमच्याकडे जी माहिती तुम्ही दिली ती सप्टेंबर महिन्यापर्यंतची आहे.

**मा. आयुक्त :-**

हो ती सप्टेंबर पर्यंतची आहे. आणि सप्टेंबर पर्यंत ११ आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, सप्टेंबर पर्यंत चर्चा होईल ना. आता डिसेंबर पर्यंतची माहिती तुमच्याकडे आहे. आमच्याकडे नाही. आम्ही चर्चा कशावर करायची.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही चर्चा करणार नाही. तुम्ही काय म्हटंल की १० टक्के कशावर काढल? जमारकमेवर. जमारकमेमध्ये .....

**शरद पाटील :-**

आपल म्हणण बरोबर आहे. लोन आहे आपल.

**मा. आयुक्त :-**

३०० कोटी रू. धरलेले आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, मी काय सांगतो. आपल ह्याच्यात टार्गेट काय होत ते सांगा ना. वसुलीचा जो टार्गेट होता ते काय होत?

**मा. आयुक्त :-**

लोकांची धारणा अशी असते की मार्च इअर एण्ड लाच भरायच असत. लोकांना अजून माहिती नाही की बिल गेल्यानंतर १५ दिवसाने नोटिस गेल्यानंतर ३० दिवसाची मुदत तुम्हाला असते.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण बोलता. घरपट्टीच्या बाबतीत बोला, किंवा कसल्या बाबतीत बोला. आपल्या पालिकेत सुध्दा आपल्या अधिकाऱ्यांच किती लक्ष असत ते आम्हाला माहित आहे. साहेब, एखादा माणुस टॅक्स भरतो. त्याच टॅक्स भरल्यानंतर त्याला परत बिल येत ते दोन्ही वर्षाच बिल येत. एक वर्षाच त्यानी टॅक्स भरलेला आहे. तो टॅक्स माफ करायला सांगतो. मी टॅक्स भरलेला आहे. माझ्याजवळ टॅक्स भरलेली पावती आहे. त्या ऑफीस मधून या ऑफीसला या. या ऑफीस मधून तिथे जा, तिथून परत ते कम्प्युटर मध्ये येत नाही. ही पध्दत असेल. लोकांनी किती त्रास घ्यायचा.

**मा. आयुक्त :-**

अस प्रकरण असेल तर माझ्याजवळ आणा.

**शरद पाटील :-**

माझ्याकडे अस प्रकरण होत. मी मॅडम कडे घेवून आलो होतो.

**बर्नट डिमेलो :-**

साहेब, अशी प्रकरण तर भरपूर आहेत. आणि उत्तन मध्ये तर भरपूरच आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, तुमच्याकडे घेवून या हे बरोबर. सगळे तुम्हीच करणार तर स्टाफ कशाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

टोटल प्रॉपर्टी लाख, दिड लाख आहेत. फ्लॅट वेगवेगळे मोजले तर. त्यामध्ये ५ टक्के अस चुकीच होणार ना.

**शरद पाटील :-**

साहेब, चुकीच होणार अस बोलून चालणार नाही. मग, आपण जी सिस्टम बाळगतो. वापरतो ते कशासाठी.

**मा. आयुक्त :-**

काही लोक चेक देतात. चेक वटायला वेळ लागतो.

**शरद पाटील :-**

साहेब, चेकचा प्रश्न नाही. कॅश भरलेली आहे. आणि तो टॅक्स भरलेली पालिकेची पावती दाखवतो. आणि त्याला दिड महिनाभर चक्कर मारायला लावतात. तो लेखी अर्ज देतो.

**मा. आयुक्त :-**

कम्प्युटर वर पैसे भरल्यानंतर आल का नाही?

**शरद पाटील :-**

साहेब, ती हाताने लिहिलेली रिसीट होती. आणि त्याने त्याच त्याला पत्र दिल. ते पत्र देवून दिड महिना झाल. अजून त्या पत्राच उत्तर आलेल नाही. त्याच्यानंतर ही ती व्यक्ती परत आली की मला पुढचा टॅक्स भरायचा आहे. तर मी काय करू आणि साहेब तुम्हाला सांगतो या सेसच्या बाबतीत पण असच चाललेल आहे. बोरसे म्हणून आपले अधिकारी आहेत त्यांच्याकडे सेस भरायला माणुस येतो. जो सेस भरतो त्याला तुम्ही सांगता पोलिस अटक करतील, हे करतील ते करतील असे नाही भरत त्यांना बोलावा. जो बिचारा भरायला येतो. ज्यांनी गेल्यावेळी पण भरलेला आहे. त्यालाच तुम्ही दम देता. मी बोलतो ते अस बोलत नाही. माझ्याजवळ पुरावे असतात तरच मी बोलतो.

**याकुब कुरेशी :-**

मागील बाकी जो माणुस पावती दाखवतो की मी गेल्यावर्षी भरलेल आहे. तर तो विषय तिकडेच संपतो ना. त्यांची पूढची जी थकबाकी असेल ती घेवून टाकायची ना. ह्याच्याकडे जायची आणि त्याच्याकडे जायची गरज काय आहे.

**मा. आयुक्त :-**

क्लार्क कोण आहे ते बघा.

**बर्नट डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही ह्या एका क्लार्कला विचारता उत्तनमध्ये असा केसेस ४० ते ५० आहेत. घरपट्टी भरून सुध्दा जर डबल घरपट्टी भरलेली पावती दाखवतो. ही गोष्ट उत्तनमध्ये भरपूर आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमच्याकडे आलेल्या लोकांची यादी करून घेवून या.

**बर्नट डिमेलो :-**

हे काय आत्ताच नाही. भरपूर लोक गेले आणि तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यांच्यावर जरा लक्ष द्या. मी प्रत्येक घरोघरी फिरू काय? तुमच मत काय मी त्यांची यादी घेवून येवू काय?

**मा. आयुक्त :-**

यादी नाही. तुमच्याकडे आलेल्या लोकांची लिस्ट करा.

**बर्नट डिमेलो :-**

मी स्वतः त्यांच्याजवळ घेवून गेलेलो साहेब ते बघाव लागेल कशी झाले. त्यांना टॅक्स भरलेली पावती दाखवतात. तरी सांगतात की, तुम्हाला दोन वर्षाच टॅक्स भराव लागेल.

**मा. आयुक्त :-**

इथे सगळ्यांना बोलवून घेतो. तुमच्याकडे भेटायला आलेल्या लोकांची तरी लिस्ट करा.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, यावेळी तुमची मालमत्ता कर ची वसुली चालू आहे. सुरूवातच केलेली आहे. मोकळ्या जागेवरील कर त्यासाठी १० कोटी रू. ची तरतुद केली होती. तर अजून १ रू सुध्दा आला नाही. सप्टेंबर महिन्यामध्ये जस तुम्ही आम्हाला दाखवल त्याच्यानंतर तुम्ही जमवल असेल तर आम्हाला माहिती नाही. त्याचा अभ्यास तुमच्याकडे आहे.

**मा. आयुक्त :-**

४३ लाख रू. एवढी वसुली झाले.

**जुबेर ईनामदार :-**

१० कोटी रू. मधून.

**याकुब कुरेशी :-**

४३ लाख रू. वसुल झाले. आमच्याकडे लोन नाही कशाला अर्धवट माहिती देता?

**जुबेर ईनामदार :-**

पूर्ण इअर एण्डींग पर्यंत १० कोटी रू. वसुल होतील का?

**मा. आयुक्त :-**

तुमच्याकडे सप्टेंबर पर्यंतच आलेले आहे. पूढच्या मिटिंगला पाहिजे तर तुम्हाला सविस्तर कळवतो.

**जुबेर ईनामदार :-**

४३ लाख रू. जमले. जानेवारीच्या आजच्या या तारखेपर्यंत. तर मार्च पर्यंत आपले १० कोटी रू. वसुल होणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

१० कोटी रू, वसुल होतील अस वाटत नाही. कारण कलेक्टरने एन.ए. बंद केल आणि ७/१२ वर इस्टेट इंनवेस्टमेन्टचे मालक म्हणून नाव आलेल आहे. तर हायकोर्टमध्ये वाद सुरू आहे. त्यामुळे जो पर्यंत एन.ए. आणि महापालिकेची परवानगी तो बांधकाम सुरू करेपर्यंत. एन.ए. मिळाल्यानंतर हा टॅक्स सुरू होतो. आणि बांधकाम सुरू झाल्यानंतर तो बंद होतो त्यामधल्या टेन्युझरचा हा टॅक्स आहे. म्हणजे एन.ए. देणच बंद झालेल आहे. येणे आता कलेक्टर साहेबांकडून कुठल्याही प्रकारच होत नाही. त्यामुळे एवढ होतील अस मला वाटत नाही.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब जेव्हा मा. महासभेमध्ये बजेट जेव्हा चालला होता तेव्हा या विषयावर बरीच मोठी चर्चा झाली. आणि त्याच्यानंतर तरतुदीचा विषय आला की, १० कोटी रू. पर्यंत आपण वसुल करू.

**मा. आयुक्त :-**

असा अंदाज होता की, एन.ए. चालूच राहिल. इस्टेट इनवेस्टमेन्टच मुळात इस्ट इंडिया कंपनीने डेवलपमेन्ट करायला घेतल होत विकास काम. नाले आणि झडपा बसवायच. त्याच १/३ पिकाचा हिस्सा होता. त्यावेळेला म्हणजे रस्ता करण्यासाठी टोल बसवला. टोल बसवल्यानंतर वसुल झाल. वसुल झाल्यानंतर टोल उठवायला पाहिजे. तर इस्टेट इनवेस्टमेन्ट कंपनी निघून गेल्यानंतर सुध्दा त्यांची नावे १/३ पिकाचा हिस्सा त्याला द्यायचा होता. विकास कामासाठी ते वसुल संगळ झाल असेल तर ते बंद व्हायला पाहिजे. आता ते मालक सदरी आले त्यामुळे आपण काही बोलू शकत नाही. मालक सदरी आल्यामुळे हायकोर्टात मॅटर चालू आहे. या विषयावर वक्तव्य करू शकत नाही त्यामळे परवानग्या जस जातील किंवा एन.ए. होतील त्या प्रमाणे ही टॅक्स वसुली आहे.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, याचा परिणाम डायरेक्ट बजट वर पडतो ना.

**मा. आयुक्त :-**

बरोबर आहे.

**जुबेर ईनामदार :-**

आपण पाहिजे तसा बजेट सुचवतो. तर आपल्याकडे तेवढी जमा बाजू राहतच असेल ना.

**मा. आयुक्त :-**

हे करेक्ट असाव म्हणून २ तारखेला मिटींग ठेवली. म्हणजे तुमची इच्छा पूर्ण होईल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हे मालमत्ता कराच जे ५२ करोड रू. ची आपली जी प्रोव्हिजन होती. तर टोटल बिल्डींग किती केलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

बिलिंग ५२ कोटी रू. केलेल आहे.

**अनिल सावंत :-**

५२ कोटी रू. बिलिंग झाल का?

**मा. आयुक्त :-**

५२ कोटी रू. बिलिंग झालेल आहे. बिल गेल, नोटिस गेल. आता ....

**अनिल सावंत :-**

५२ कोटी रू. झाले की, ५२ कोटी रू. पेक्षा जास्त झालेल आहे? टोटल बिलिंग किती झाले?

**संजय गोखले :-**

आता नविन-नविन रिपेरिंग प्रॉपर्टीच बिल असेल. पण पहिली ५२ कोटी रू. ची बिल पूर्ण केलेली आहेत.

**अनिल सावंत :-**

या २००९-२०१० च्या वर्षामध्ये टोटल आपली बिलिंग ५२ कोटी रू. च झालेल आहे.

**जुबेर ईनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, मालमत्ता करावर विषय मी तुमच्याकडे आणला होता. शांती नगर परिसरामध्ये छपरे काढले होते. आणि ज्यांच्या वर छप्पर होते त्यांना कर आकारणी केली होती नंतर ते छपरे काढण्यात आले. तरी आज सुध्दा ज्यांनी नाही लावले त्यांना आज ही छप-याचा टॅक्स लावला जातो. आणि प्रत्येक वर्षी ती आपल्याकडे थकबाकी राहतेच राहते. कारण त्यांच्याकडे छपरे नाही. आणि कमीत कमी मी घेतलेल्या माहिती प्रमाणे दोन-अडीज कोटी रू. प्रत्येक वर्षी थकबाकी त्या छप-याची आपल्याकडे बजेटमध्ये रिफ्लेक्ट होतात. त्याचा कुठेतरी निर्णय घ्यावा लागेल ना.

**मा. आयुक्त :-**

छपरा नसेल पण ते जागेत बाकडे मांडुन करतात ना.

**जुबेर ईनामदार :-**

छपरा नाही ना. छप-याचा टॅक्स लावलेला आहे. आपण बाकड्याचा टॅक्स लावलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

छप-याचा टॅक्स लावला. परंतु, फुटपाथ आमच सामान मांडायलाच युझ होत ना.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, फुटपाथ पे गटर बनाया ना.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, तस आपल्याला कराव लागेल. फुटपाथ तुम्ही वापरता. फुटपाथच्या खाली तुम्ही बाकडे लावतात ना. कारण, लोकांना समज कशी पोचवायची. त्यांचा पैसा बाकी अहे. त्यांनी वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग अधिकारी. ज्यांचे ज्यांचे छपरे काढलेले आहेत. तर अचानक जायचे. १०-१५ दिवस झाल्यानंतर किराणा दुकानदाराने त्यांचा माल आपल्या जागेवर ठेवलेला आहे का? हॉटेल वाला बाकडे ठेवले का? टेबल मांडला का? हे सगळ बघुन घ्या. आणि टिपण करून घे. मुळ आपली जागा ते वापरतात म्हणून तो टॅक्स आहे. छपरा असो किंवा नसो. जागा वापरतात ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

फक्त एक आहे की, आपण छप-याला टॅक्स लावतो ना.

**मा. आयुक्त :-**

छपरा हा नेहमीचच कारण आहे. ते आपल फुटपाथ वापरतात ते काय?

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, फुटपाथ नाही वापरत, त्यांच्या बिल्डींगची जी हद्द असते, सोसायटीच. तेवढे ते वापरतात.

**मा. आयुक्त :-**

मार्जिन डिस्र्ल्स मध्ये काही ठेवायच नाही.

**मदन सिंग :-**

मा. आयुक्त साहब, अगर किसी चिज मे अपनी गलती है तो अपनी गलती स्विकारके दुसरे के उपर उस्से बडा गलती लगा देने का क्या? अगर घरका, दुकान का टॅक्स भरते है तो बाहर नही निकालेंगे क्या? अंदर ही रहेंगे।

**मा. आयुक्त :-**

साहेब, प्रत्यक्षात आपल जे मार्जिन डिस्टन्स दुकानदार दुकानाच्या आत माल असायच. गि-हाईक फुटपाथ पर उभे राहतात. आणि दुकानदार माल देतो. तर त्याच दुकानच फुटपाथ वर आल. तर गि-हाईक उभ राहतात फुटपाथच्या खाली त्यामुळे माल जो ठेवण्यासाठी वापरला गेला. त्याच्या दुकानामध्ये न ठेवता तो बाहेर ठेवला. आणि गि-हाईक बाहेर उभी राहिली. त्यामुळे मार्जिन डिस्टन्स आहे तो आमच्यासाठी आहे. त्यांच्यासाठी नाही. म्हणजे ह्यांच्या गि-हाईकांना उभे रहायला. माल बाहेर मांडला म्हणजे टॅक्स सुरू झाला.

**जुबेर ईनामदार :-**

तो कसा पकडला ते सांगा ना. सोसायटी किंवा बिल्डींग ची ....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही त्यांना सांगा म्हणजे त्यांना सुध्दा माहिती पडेल.

**मा. आयुक्त :-**

ते टॅक्स न म्हणता अतिक्रमण फी म्हणतात.

**जुबेर ईनामदार :-**

अतिक्रमण महापालिकेच्या रस्त्यावर ना.

**मा. आयुक्त :-**

नाही. आमच्या मार्जिन डिस्टीन्स....

**जुबेर ईनामदार :-**

महापालिकेच्या रस्त्यावर लोक उभी राहिली तरी अतिक्रमण झाल अस आहे का?

**मा. आयुक्त :-**

गि-हाईक कुठेही उभी राहिली तर चालत. त्याच माल फुटपाथ वर येता कामा नये.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, अब गटर पर स्लॅब डाया है, तो गटर पे माल नही रहता है।

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, आपण शहरामध्ये बहुतेक नाले तयार केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, तुमच आता निरसन केल आहे.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, तुम्ही त्यांना सुचना द्या.

**मा. आयुक्त :-**

अचानक ना. आता तुम्ही त्यांना सावध करा म्हणून १०-१५ दिवसात अचानक केव्हा तरी जायला सांगेल.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, तुम्ही त्यांना अचानक केव्हाही रात्री १२ वा. पाठवा. त्यांना फक्त तेवढ सांगा की, नाल्याच्या आतमध्ये साहेब, तुम्ही त्याचा रितसर मार्ग काढा ना.

**मा. आयुक्त :-**

अचानक १०-१५ दिवसामध्ये भेट देउन नियंत्रण करा आणि व्हिडीओ कॅसेट काढा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, जभी गायकवाड साहब ये सभी उन्होने बोला था की गटर के उपर जभी सामान रखते है ना उनका उठाके लेकर आना. उसके बाद इतना शांती हुआ था। गटर के उपर कभी कोई सामान नही रखता था।

**मा. आयुक्त :-**

नही रखेंगे तो साहब के मुताबीत कट करेंगे।

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, सिनेमा नाट्यगृह, सर्कस, जत्रा, मॅक्सेस मॉलला तर नेहमीच जत्रा भरलेली असते तरी आपले पैसे वसुल होत नाही.

**मा. आयुक्त :-**

जत्रा नाही, जत्रा म्हणजे ओपन लॅन्ड वर भरलेली जत्रा.

**जुबेर ईनामदार :-**

तिथे सुद्धा ओपन लॅन्ड आहे ना.

**मा. आयुक्त :-**

बांधलेल आत जातात.

**जुबेर ईनामदार :-**

मॅक्सस मॉलची जी जागा आहे ती महापालिकेची आहे. ओपन लॅन्ड आहे.

**मा. आयुक्त :-**
नाही.
**जुबेर ईनामदार :-**
आपल ग्राउंड आहे ना.
**शरद पाटील :-**
साहेब, बाहेरच ग्राउंड आपल आहे ना.
**जुबेर ईनामदार :-**
त्या मैदानामध्ये तर जत्रा लागलेलीच असते. तरी पैसे वसुल होत नाही. ३५ लाखच होत.
**मा. आयुक्त :-**
वर्षातुन ३० दिवस त्यांच्यासाठी आहे. इतर दिवस महापालिकेच्या प्रायमरी स्कुल लोकांना ओपन आहे. त्यामुळे ३० दिवसामध्ये जे येणार आहे. त्याच भाडं तो आपल्याकडे वर्षाच भरतो. बाकीचे ११ महिने जे आहे ते महापालिकेचे ग्राउंड आहे. म्हणजे कोणालाही, कितीवेळ तिथे उभे रहायचे आहे. जत्रा भरवायची आहे. खेळायच हे चालू असत. त्याच टॅक्स वसुल करण्याचा प्रश्न येत नाही.
**याकुब कुरेशी :-**
माझ्या माहितीप्रमाणे जवळ जवळ ६ महिने झाले तिकडे बघतो जत्रा भरलेली तर त्याची थकबाकी किंवा त्याच एक महिना संपल्यानंतर बाकीचे पैसे आपल्याजवळ जमा होतात का?
**मा. आयुक्त :-**
नोटीस काढा.
**मदन उदितनारायण सिंग :-**
मा. आयुक्त साहेब, वहा टोटल ११ महिने मे कितना पावती फाडा और अपने पास कितना वसुली आया है।
**मा. आयुक्त :-**
कौनसी पावती.
**मदन उदितनारायण सिंग :-**
जो मैदान मे अपून दुसरे को दिया है। १ महिने के अंदर उसका अपने पास कितना पैसा आया?
**मा. आयुक्त :-**
बच्चे लोग खेलने के लिये जाते है ना।
**मदन उदितनारायण सिंग :-**
खाली ही नही रहता है तो खेलेंगे कहा से?
**मा. आयुक्त :-**
खाली ही नही रहता है इसका मतलब उन्होने दुकान तो नही मांडा ना.
**मदन उदितनारायण सिंग :-**
दुकान ही बैठता है। कुछ ना कुछ दुकान ही बैठता है। परमनंट दुकान ही बैठता है।
**मा. आयुक्त :-**
प्लान ॲप्रुवल केल त्यामधल्या १० टक्के आहे. १० टक्के त्याला कंन्स्ट्रक्शन अलाउड केल आहे.
**शरद पाटील :-**
फक्त १० टक्क्यामध्ये लावतात अस आपल म्हणण आहे का?
**मदन उदितनारायण सिंग :-**
१० टक्के बाउन्ड्री मारून त्यांनी ठेवावी ना.
**शरद पाटील :-**
मग आम्हाला पण त्याची व्हीडीओ शुटींग करायला लागेल.
**जुबेर ईनामदार :-**
साहेब, आजच्या तारखेमध्ये त्यांनी गेट लावलेला आहे तर तो रस्ता १० टक्के मध्ये गेला ना. त्याच्यामध्ये सुद्धा त्यांनी लावलेले आहे. त्यांनी ज्या रस्त्यात गेट बांधलेला आहे. सिनेमा घराच्या बाहेर तो १० टक्के च्या आतमध्ये आला असेल. त्याच्यापेक्षा जास्त असणारच.
**मा. आयुक्त :-**
मॅक्सस मॉल आणि ग्राउंड यामध्ये रोड आहे रोड सोडून त्याला ग्राउंड मधले १० टक्के.....
**जुबेर इनमादार :-**
तो स्वतःकडचा रोड ही वापरतो. त्याच त्या रस्त्यावर अतिक्रमण आहे. तर तो गेट आपण आजपर्यंत काढला का?

**याकुब कुरेशी :-**

मा. आयुक्त साहेब, मॅक्सस मॉलच्या तिकडे जो रस्ता आहे. महानगरपालिकेचा आहे. तुमच्या सांगण्याप्रमाणे तो नगरपालिकेचा आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही. तो रोड आहे.

**जुबेर इनामदार :-**

मग त्यांनी एवढा मोठा गेट का लावला?

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या प्रॉपर्टीमध्ये जाण्यासाठी.

**जुबेर ईनामदार :-**

त्यांनी त्यांच्या प्रॉपर्टीमध्ये तो महानगरपालिकेचा रस्ता आहे.

**याकुब कुरेशी :-**

केला त्यांनी.

**दिपक खांबित :-**

तो इंटरनल रस्ता आहे. तो डी.पी. रस्ता नाही आणि आपण केलेला रस्ता नाही.

**अनिल सावंत :-**

मॉलमध्ये जायला की, पलीकडे जायला.

**मा. आयुक्त :-**

सोसायटीने आतला रस्ता बनवला तर गेट लावणारच ना.

**अनिल सावंत :-**

साहेब, मला वाटत हा विषय प्रत्येक वेळी वर्षातुन ५-६ वेळा येतो. आणि प्रत्येक वेळी प्रशासन वेगवेगळी माहिती देते. मागच्यावेळी प्रशासनाने ॲग्रीमेंटच दाखवले होते. त्या ठिकाणी २-२ ॲग्रीमेंट होते. तिथे प्रोड्युस केल्या नक्की त्याच्या बरोबर बी.ओ.टी. चे ॲग्रीमेंट काय बनते.

**याकुब कुरेशी :-**

एक काम करा की, पुढच्या मिटींगमध्ये मॅक्सस मॉल चे प्लानच घेवून या ना.

**मा. आयुक्त :-**

ॲग्रीमेंट आणि प्लान द्या.

**बर्नट डिमेलो :-**

शहराच्या हिताचा विषय आहे तर तो विषय घेवून या मॉल, मॉल काय घेवून बसले.

**याकुब कुरेशी :-**

जेव्हा तेव्हा तोच विषय येतो तो विषय कायमचा संपवण्यासाठी मी बोलतो.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने दिशाभूल करू नये.

**मा. आयुक्त :-**

दिशाभूल करण्याचा प्रश्न कुठे आहे? जवळ जवळ शंभर जणांनी ॲग्रीमेंट आणि प्लान ची कॉपी नेलेली आहे.

**अनिल सावंत :-**

ॲज पर ॲग्रीमेंट इम्प्लीमेंट होत नाही ना.

**मा. आयुक्त :-**

ॲज पर ॲग्रीमेंट इम्प्लीमेंट होते. ३० दिवस सोडून बाकीच दिवस मुलांसाठी, इतरांसाठी फ्री असतं.

**अनिल सावंत :-**

त्यांना त्या ग्राउंडवर कब्जा केलेला आहे. तिथे जे खेळ लागतात.

**मा. आयुक्त :-**

त्याला १० टक्के खेळ इंन्स्ट्रक्शनस मध्ये अलाउड करतात.

**अनिल सावंत :-**

नाही १० टक्के ते मॉलमध्ये आल.

**मा. आयुक्त :-**

आता ह्यांनी सुचवल्यामुळे तुम्हाला ॲग्रीमेंटची आणि प्लॅनची कॉपी देतो.

**अनिल सावंत :-**

ठिक आहे.

**मा. आयुक्त :-**

इंडीव्हीजुअल जाण्यापेक्षा आतापर्यंत आम्ही १३० कोटी रू. वसुल केलेले आहेत. ५० कोटी रू. पर्यंतची वसुली मार्च पर्यंत होईल.

**जुबेर ईनामदार :-**

तरतुद ३५ ची आहे.

**मा. आयुक्त :-**

१८० करायची होती. १३० कोटी रू. वसुल झालेल आहे आणि ५० कोटी रू. मार्चपर्यंत वसुली करायची आहे.

**अनिल सावंत :-**

होउन जाईल ना.

**मा. आयुक्त :-**

उद्यापासुन नळ कनेक्शन तोडायला सुरूवात करतो.

**अनिल सावंत :-**

जे रेग्युलर असतात त्यांना एक्स्ट्रा पाणी द्या.

**मा. आयुक्त :-**

आम्ही आता पाणी बंद केल. पाण्याची पट्टी आम्ही घेत नाही. प्रॉपर्टी टॅक्स भरल्यानंतरच पाणी पट्टी घेणार.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुम्ही पोलिस स्टेशनला कळवल का?

**मा. आयुक्त :-**

हो कळवल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, माझी एक शंका आहे. त्यामुळे मी विचारतो की, सोसायटीतले काही सदस्य मेन्टनेन्स वगैरे काही भरत नाही. काही लोक फ्लॅट मध्ये राहतच नाही. त्याच्यामुळे आपला टॅक्स भरणा होत नाही. आणि टॅक्स भरणा न झाल्यामुळे नगरपालिका ती लाईन कट करते.

**मा. आयुक्त :-**

हे लाईन कट होणार. त्यांचा सोसायटी वाल्यांनी बघायच. त्यांचा प्रॉब्लेम आम्ही कसा काय सोडवणार.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्यांनी बिल भरल नसेल आणि त्यांची लाईन कट केली तर ते लोक पोलिस स्टेशनला जातात.

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे जे लोक येतील ना हा थकबाकी भरा त्याच कनेक्शन तोडतो तर मी त्याला पत्र देतो ना.

**जुबेर ईनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही ह्याची माहिती उप निबंधकास पाठवून द्या. कारण तिथून जर पत्र आल तर वाढतच जात. तिथे जावून तक्रार केली तर तिथून पत्र पाठवतात.

**मा. आयुक्त :-**

सोसायटीच्या सेक्रेटरीने आणि चेअरमनने मला कळवाव की, ह्या ह्या नंबर वाल्यांच येण राहिलेल आहे. अस जर कळवल तर आम्ही निबंधकाला कळवू.

**जुबेर ईनामदार :-**

मा. सभापती साहेब, मालमत्ता कर, करधारक भरतात. महापालिकेच कर्तव्य आहे की, त्यांना मुलभुत सुख सुविधा उपलब्ध करून देणे. त्याच्यामध्ये आरोग्य हा मोठा विषय आहे. आता आरोग्याच्या दृष्टीकोनाने शहरात कचराच उचलला जात नाही.

**मा. आयुक्त :-**

कोण बोलल? कचरा जर उचलला नसता तर १०-१० ट्रक थांबले असते ना.

**जुबेर ईनामदार :-**

तरी ज्या पद्धतीने उचलला गेला पाहिजे त्या पद्धतीने उचलला जात नाही. आम्हाला....

**मा. आयुक्त :-**

एका ठिकाणी जर चार महिन्यापासुन कचरा उचलला जात नाही. तर एक गल्लीमध्ये १० ट्रक कचरा जमा होईल. तर तुम्ही दाखवा कुठल्या गल्लीमध्ये १० ट्रक कचरा आहे. काहीतरी करून कचरा उचलतो. आणि सिचवेशन सगळ्यांना माहित आहे. तुम्हाला पण माहित आहे. गावाला माहित आहे सगळ्यांना माहित आहे. आम्ही ज्या सिचवेशनमधुन जातो ती सगळ्यांना माहित आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, लोक विचारतात ना.

**मा. आयुक्त :-**

लोकांना पण माहित आहे. कशासाठी उचलत नाही.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, कचऱ्यामुळे तेवढाच डासांचा त्रास वाढला. आपण किती उपचार केले. तरी त्याचा काही फायदा झाला का? कारण, कचरा जागोजागी पडलेला आहे. रोजच्या रोज उचलला जात नाही. त्यांनी अडचण आम्हाला माहित आहे. प्रॉब्लेम्स् आहे तो आहे. आता त्यातुन मार्ग तर काढायला लागेल ना. लोकांना उत्तर काय द्यायची. साहेब, आज कराच अस आहे की, शहरामधले ९५ टक्के जे करधारक आहेत. ते एकाबाजूला राहतात. आणि त्यांना ह्याचा त्रास भोगावा लागला. मग, त्यांनी भराव तरी का? ९५ टक्के जे करधारक आहेत. ते कर प्रामाणिक पणे भरतात. किंवा प्रामाणिक पणे कर भरतील त्यांना त्रास सोसावा लागतो ना. मा. सभापती साहेब ९५ टक्के करधारक एक बाजूला आहे. आणि ५ टक्के ...

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला ऐकण्यासाठी बोलायला लागले. आम्हाला नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब, मला एक म्हणायच आहे. तुम्ही नेहमी दुसरे मागवलेले आहे. उत्तन वाले वेगळे, भाईंदरवाले वेगळे, मिरारोड वाले वेगळे, तुम्हाला कशाला ते प्रशासनाला सांगतात. त्यांचा काय संबंध. ते त्यांची बाजू मांडतील ना. प्रशासनाने ते ऐकायला पाहिजे. प्रशासनाने करोडो रू. खर्च केलेले आहेत. ज्यावेळी हा प्लान झाला. त्यावेळी ठराव उत्तनच्या नगरसेवकांनी मांडलेला आहे. करोडो रू. महापालिकेचे खर्च झाल्यानंतर तो प्लान ६ महिन्यापासून बंद ठेवता. तर प्रशासनाची काहीच जबाबदारी नाही.

**मा. आयुक्त :-**

सर्वांत जास्त जबाबदारी आम्ही निभवलेली आहे जे करायच आहे ते संगळ केलेल आहे.

**अनिल सावंत :-**

मग, तिथल्या लोकांना जो त्रास होतो. त्याचे प्रिकॉशन का नाही घेतली गेली?

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टाची ऑर्डर आहे, गर्व्हरमेन्टची ऑर्डर आहे. फक्त त्यांना कलेक्टर साहेबांना आणि डिवीजनल कमिशनर साहेबांना नियोजन करायच आहे. किती तारखेला करायच ते. आणि त्या पत्रामध्ये लिहिलेल आहे. कलेक्टर आणि डिविजनल कमिशनरने आणि स्वतः एस.पी. ने उभे राहून सुरू करायच आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, सगळ मान्य. तरीसुध्दा प्लान चालु झाला का? सुरू करायच आहे ते बरोबर आहे. पण तिथल्या स्थानिक लोकांना जो त्रास होतो. त्याच्याबद्दल जे महाराष्ट्र गर्व्हरमेन्ट ने किंवा पोल्युशन कंन्ट्रोल बोर्डाने जे प्रिकॉशन तुम्हाला घ्यायला सांगितल ते तुम्ही का घेत नाही.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांना सांगितलेल आहे. आणि प्रिकॉशन घेतलेले आहे.

**अनिल सावंत :-**

आपण प्रिकॉशनच्या किती टक्क्यापर्यंत पोहचतो? महाराष्ट्र शासनाने जे प्रिकॉशनचे गाईड लाईन दिले होते. आपण ते १०० टक्के फुलफिल केल का?

**मा. आयुक्त :-**

तुमच्याकडे सगळा विषयच ठेवलेला आहे.

**अनिल सावंत :-**

फक्त एक लॅण्ड फिलींगचा ठेवलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

लॅण्ड फिलींगचा ठेवला. ट्री प्लान्टीनिएशन लावायला सुरू आहे. कंम्पाऊन्ड वॉल बांधायच मा. महासभेपुढे विषय ठेवलेला आहे. आणि ज्यांनी ज्याच्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्या-त्या गोष्टी सगळ्या आणि कॉन्ट्रॅक्टरने जे करायच ते त्यांनी केल.

**अनिल सावंत :-**

पूर्णतः केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

हो.

**अनिल सावंत :-**

मग, ते लवकर चालू करा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, वह चालू कभी होगा?

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, त्या लोकांना उत्तर देण कठीण झालेल आहे. एका बाजुला पाणी नाही.

**मा. आयुक्त :-**

मी असा विचार केला. सगळे कौन्सीलर आणि सगळे प्रशासनाचे अधिकारी. एकच टाईमाला आपण जायचे आहे. डेट फिक्स केली की मी सगळ्यांना कळवतो.

**जुबेर ईनामदार :-**

चालेल. साहेब, परवाना विभाग. आम्ही १० कोटी रू. ची तरतुद केली होती. आणि हा पैसा जमवू शकतो.

**मा. आयुक्त :-**

आपण आता काय केल की, आपण हाऊस टू हाउस पाठवून तिथेच रजिस्ट्रेशन करायला दिले आहे. या दोन महिन्यामध्ये १ कोटी रू. वसुल झाले आहे.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, या शहरामध्ये २८ हजारापेक्षा जास्त अस्थापना आहेत. आहे हे तुमच This is Revenue. जास्त ह्याच्यावर जेवढ जोर धरला तेवढ त्याचा फायदा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

मा. महासभेचा अंदाज २ कोटी रू. चा होता. आयुक्तांचा अंदाज १ कोटी रू. होता.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, जे रस्त्यावर बसतात. त्यांच्या जवळून महापालिका ३ करोड रू. वसुल करतात बाजार फी.

**जुबेर ईनामदार :-**

ते तिथे धंदा करतात. त्यांचा व्यवसाय आहे. त्याच्याकडून आपल्याला नाही मिळणार अस तर नाही. त्या अनुषंगाने आम्ही १० कोटी रू. केले होते. बाजार आपण ३ कोटी रू. घेतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेने ते कर्टेल केल ना.

**जुबेर ईनामदार :-**

कुठे केल साहेब?

**अनिल सावंत :-**

साहेब, नाही केल. १० करोड रू. च आहे.

**जुबेर ईनामदार :-**

ठराव करून दिलेला आहे. आम्ही लायसन्स फी चा ठराव दिला आहे. साहेब, प्रोसिडींगमध्ये सेसच्या वेळी २८ हजार अस्थापने आहे.

**मा. आयुक्त :-**

१० हजार आहे.

**जुबेर ईनामदार :-**

मिरा भाईंदरमध्ये फक्त १० हजार आहे. लहान मोठे मग, सेसवाल्यांनी तेव्हा आम्हाला खोटी माहिती दिली होती का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सेसच रजिस्ट्रेशन केल आहे.

**जुबेर ईनामदार :-**

त्यातुन रजिस्ट्रेशन किती झाल होत. साडे नऊ १० मधून साडे नऊ हजार रू. रजिस्ट्रेशनच झाल. सेसमध्ये १०० टक्के रजिस्ट्रेशन झाल होत का? पानपट्टे माहिती नाही. तर तुम्ही त्याची माहिती घ्या.

**मा. आयुक्त :-**

सेसच आस्थापना किती आहे?

**नरेंद्र चव्हाण :-**

१०५०० आस्थापना आहे.

**जुबेर ईनामदार :-**

१०५०० आस्थापना रजिस्ट्रर झाले होते. अनरजिस्ट्रेड मी बोलतो. टोटल.

**मा. आयुक्त :-**

टोटल अन रजिस्ट्ररेड किती आहे.?

**नरेंद्र चव्हाण :-**

५ हजार आहे.

**जुबेर ईनामदार :-**

७ हजार असतील. २८ हजारच मी तुम्हाला फिगर आणून देतो. आमच्या गोषवाऱ्यामध्ये रेकॉर्ड आहे.

**मा. आयुक्त :-**

सेसवाले जेव्हा सगळे स्कॉड नेमला होता. त्यांचा सर्व्हे प्रमाणे किती आस्थापना आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रेकॉर्ड १०५०० हजार आहे.

**जुबेर ईनामदार :-**

ते रजिस्ट्रर झालेल आहे. म्हणजे तुमचे २५ टक्के सेसमध्ये रजिस्ट्रर झाले नव्हते. आता ह्यांनी १०५०० + ७ हजार. म्हणजे साडे सतरा, अठरा हजार त्यांनी आता समोरासमोर तुम्हाला माहिती दिली. टोटल २० हजार पकडा. तुमचा तो रेव्हेन्यु आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सरासरी एक दिड हजार.

**मा. आयुक्त :-**

दिड हजार प्रमाणे सव्वा दोन कोटी रू. होतात.

**जुबेर ईनामदार :-**

या शहराला रेव्हेन्युची गरज आहे. उद्या तुमच हॉस्पीटल आहे. परत बाकीचे कामकाज चालवायच आहे. तुमचा पगार आणि आमच मानधन उरणार नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, भाईंदर पूर्व, पश्चिम चौपाटी विस्तार. याची तरतुद आहे ५ लाख रू. ची खर्च झाला ७४ लाख रुपये.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण तिकडे नगरसेवक निधी आणि आमदार निधीच केलेल आहे. आमदार निधी तिकडे वापरला.

**मा. आयुक्त :-**

चौपाटीवर जो खर्च झाला तो आमदार निधी, नगरसेवक निधी, याच टोटल खर्च त्यात पडला असेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पण ते चूकीचे आहे ना.

**मा. आयुक्त :-**

आमदार निधी जरी असला तरी तो आमच्याकडे जमा होवूनच खर्च होतो ना.

**अनिल सावंत :-**

तो आमदार निधीमध्ये खर्च व्हायला पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आमदार निधी वेगळी आहे. हेड आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या हेडला जायला पाहिजे. वापरतो तो खर्च इथे आला.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आमदार निधी वेगळा हेड आहे. तो खर्च त्या हेडमध्ये जायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

साहेब, सगळं ठिक आहे. पण एवढी मोठी चूक होत असेल तर कस व्हायच.

**मा. आयुक्त :-**

७४ लाख रू. त्या त्या हेडमध्ये तेवढी विभागणी व्हायला पाहिजे होती.

**शरद पाटील :-**

आता ही तरतुद पाच लाख रू. ची आहे. आणि ७४ लाख रू. खर्च होतो. तर विषय तिथे येतो ना.

**मा. आयुक्त :-**

तुमच म्हणण बरोबर आहे ना.

**वर्षा भानुशाली :-**

नगरसेवक निधी का अलग से दिया हुंआ है।

**मा. आयुक्त :-**

आमदार साहब का जो फंड था। वह उसने ७४ लाख पडा है। वह अलग करना जरूरी था। टोटल अमाऊंट उधर पडा। लेकिन बायफररोशन होना चाहिए था। वह हुआ नही।

**शरद पाटील :-**

साहबे, सन्मा. सदस्या वर्षा भानुशाली मॅडम जे बोलतात ना. ते पहिल क्लिअर करा। नगरसेवक निधी, आमदार फंड, खासदार फंड आहे की नाही. किंवा नगसेवक निधी नाही हे सांगा.

**दिपक खांबित :-**

साहेब, तिघांचा नगरसेवक निधी आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याच्यात नगरसेवक निधी वेगळा आहे. त्याचा हेड आहे.

**दिपक खांबित :-**

आहे. पण हा निधी ह्याच्यामध्ये जायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

जायला पाहिजे. विभागणी व्हायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

४० लाख रू. आमदार मुझफ्फर हुसेन साहेबांनी दिला. ८ लाख रू. वर्षा भानुशाली मॅडमने दिले. ७ लाख रू. नरेंद्र मेहता साहेबांनी दिले. आणि १५ लाख रू. शानू गोहिल मॅडम यांनी दिले.

**शरद पाटील :-**

७० लाख रू. झाले.

**मा. आयुक्त :-**

आपल्या फंड मधून ४ लाख रू. घातले.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पिसि.एल पावडर ॲण्ड क्लोरिन गॅस तरतुद २८ लाख रू. ची आहे. खर्च ४० लाख रू. केला महसुली खर्च, पाणी पुरवठा. एप्रिल ते जून पेज नं. २८.

**मा. आयुक्त :-**

प्रिन्टींग मिस्टेक आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सगळ्या ठिकाणी मिस्टेक करून आमच्याकडे घेवून येता. आम्ही ठराव मांडतो मंजूर करतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आमची सुचना आहे की, ह्या सगळ्या मिस्टेक आहे ना. त्या ठिक करून पुढच्या मिटिंगमध्ये हा विषय घेवून या.

**अनिल सावंत :-**

ऑक्टोंबर-डिसेंबरचा घेवून या. सगळं एकत्र मंजुरी देवू.

**मा. सभापती :-**

आपल्या दुरूस्ती आहेत ना. त्या प्रती कागद काढा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहेब. या दोन चुका आमच्या लक्षात आल्या. बाकीच्या चुका आमच्या लक्षात आल्या नाही. त्यात काय करायच.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग साहेब, जे काही दुरूस्ती असतील ना ते दुरूस्ती करून मंजूर करू या. कारण बजेट च्या मिटिंग चालू होतील.

**शरद पाटील :-**

जर तुम्हाला विषय मंजुर करायचा असेल तर पेज वाईझ जावू या.

**मा. सभापती :-**

जनरल हिशोब आपल्याकडे आलेला आहे. तर काय असेल तर त्यावर सूचना द्यावी. आपण पेपरवर काढू आणि त्यांच्याकडून मागवू,

**जुबेर ईनामदार :-**

मा. सभापती साहेब, या विषयाकरिता विशेष बैठक लावावी लागेल. कारण, आपल्याला पूर्ण दिवस कमी पडेल. ह्याला दुरूस्ती सहित मंजूर करू घेवू या. आणि त्याच्या करिता पूर्ण दिवस देवू.

**मा. सभापती :-**

ह्या विषयासाठी आपण एक विशेष मिटींगच लावू.

**अनिल सावंत :-**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ०९ ते जून ०९ व माहे जुलै ०९ ते सप्टेंबर ०९ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००९-१० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ०९ ते जून ०९ व माहे जुलै ०९ ते सप्टेंबर ०९ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास दुरुस्तीसह मंजूरी देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

दुरूस्तीसह विषयाला मंजुरी मिळालेली आहे. सर्व सदस्यांनी लक्ष द्यावं. आपल्याकडे एक खुशीची बातमी आले. ड वर्ग मधील पहिली मिरा भाईंदर महानगरपालिकेला लेखा परिक्षक विभागाला आय.एस.ओ. २००१-२००० मिळालेला आहे. त्याच मा. आयुक्त आणि स्थायी समिती याला अभिनंदनास पात्र आहे.

**प्रकरण क्र. ११० :-**

त्रैमासीक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ०९ ते जून ०९ व माहे जुलै ०९ ते सप्टेंबर ०९ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००९-१० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ०९ ते जून ०९ व माहे जुलै ०९ ते सप्टेंबर ०९ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास दुरुस्तीसह मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दि. सावंत अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११, पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

हेलन गोविंद :-

नमूना क्र. १० नियम ३०(३) पहा.

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A.Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aajatarko pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aajatarko pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcal r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| १ | बाजारपेठ व कत्तलखाने पृष्ठ क्र. २८ | मार्केट बांधकाम | ५२५.०० लक्ष | - | ५२५.०० लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९<br><br>सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९<br><br>रस्त्यावरील दिवाबत्ती पृष्ठ क्र. १४ | नविन रस्ते बांधकाम<br><br>नविन गटारे / नाले बांधकाम<br><br>विज बिलाचा खर्च (स्ट्रीट लाईट) | ८००.०० लक्ष<br><br>३००.०० लक्ष<br><br>७५०.०० लक्ष | ७८०.०० लक्ष<br><br>२९०.०० लक्ष<br><br>६९२.७२ लक्ष | १७०.०० लक्ष<br><br>१००.०० लक्ष<br><br>२५०.०० | मार्केट बांधकाम या लेखाशिर्षाखाली रू. ५२५.०० लक्ष एवढी तरतूद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१० पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून ''नविन रस्ते बांधकाम'' या लेखाशिर्षाखाली रू १७० लक्ष ''नविन गटारे / नाले बांधकाम या लेखाशिर्षाखाली रू. १०० लक्ष विज बिलाचा खर्च (स्ट्रीट लाईट) या लेखाशिर्षाखाली २५० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | विशेष निधी पृष्ठ क्र. २० | प्रभाग समिती निधी | ४००.०० लक्ष | ३.४० लक्ष | ३९६.६० लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. १९<br><br>सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा<br><br>भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम | ८००.०० लक्ष<br><br>४००.०० लक्ष | ७३०.०० लक्ष<br><br>३७०.०० लक्ष | १००.०० लक्ष<br><br>१००.०० लक्ष | प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाखाली रु. ४००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा'' या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ३ | स्मशानभूमी पृष्ठ क्र. २८ | विद्युत दाहिनी | ५०.०० लक्ष | ३७.८० लक्ष | १२.२० लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. १९ | सार्वजनिक इमारती दुरुस्ती | ५.०० लक्ष | ८.९३ लक्ष | १०.०० लक्ष | ''विद्युत दाहिनी'' या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''सार्वजनिक इमारती दुरुस्ती'' या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | नविन शाळा इमारत बांधकाम / संगणक लॅब बांधणे. पृष्ठ क्र. ३१ | १००.०० लक्ष | १९.३४ लक्ष | ८०.६६ लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. ३० | डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल | १४००.०० लक्ष | १३९९.०० लक्ष | ६०.०० लक्ष | ‘‘नविन शाळा इमारत बांधकाम / संगणक लॅब बांधणे.’’ या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल’’ या लेखाशिर्षाखाली रु. ६०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ५ | विशेष निधी पृष्ठ क्र. २० | नगरसेवक निधी | ८४०.०० लक्ष | ४१३.३४ लक्ष | ४२६.६६ लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. ३० | डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल | १४००.०० लक्ष | १३९९.०० लक्ष | १००.०० लक्ष | ‘‘नगरसेवक निधी’’ या लेखाशिर्षाखाली रु. ८४०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल’’ या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | शाळेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा पृष्ठ क्र. २१ | २५०.०० लक्ष | -- | २५.०० लक्ष | नविन विद्युत कामे पृष्ठ क्र. ३२ | नविन स्ट्रीट लाईट | ३५.०० लक्ष | ३४.४७ लक्ष | ८.०० लक्ष | ''शाळेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा'' या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''नविन स्ट्रीट लाईट'' या लेखाशिर्षाखाली रु. ८.०० लक्ष ''सर्व धर्मीय उत्सव मंडप / लाईट/ इतर व्यवस्था या लेखाशिर्षाखाली रु. २.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच ''धोकादायक इमारती पाडणे व परिक्षण'' या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष वर्ग होण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. |
| | | | | | | संकिर्ण पृष्ठ क्र. २३ | सर्व धर्मीय उत्सव मंडप / लाईट/ इतर व्यवस्था | ६०.०० लक्ष | ५९.०० लक्ष | २.०० लक्ष | |
| | | | | | | संकिर्ण पृष्ठ क्र. २४ | धोकादायक इमारती पाडणे व परिक्षण | १.०० लक्ष | ७.११ लक्ष | १०.०० लक्ष | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर पृष्ठ क्र. २६ | ५०.०० लक्ष | १०.३४ लक्ष | ३९.६६ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन गटारे / नाले बांधकाम | ३००.०० लक्ष | २९०.०० लक्ष | ३५.०० लक्ष | ‘‘अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर’’ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन गटारे / नाले बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. ३५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ८ | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | सार्वजनिक तळी विहिरी सुशोभिकरण करणे | ७०.०० लक्ष | ७.४९ लक्ष | ६२.५१ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन रस्ते बांधकाम | ८००.०० लक्ष | ७८०.०० लक्ष | ५०.०० लक्ष | ‘‘सार्वजनिक तळी विहिरी सुशोभिकरण करणे’’ या लेखाशिर्षाखाली रु. ७०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन रस्ते बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | प्रभाग कार्यालय / इमारत बांधकाम | ७०.०० लक्ष | ३.३९ लक्ष | ६६.६१ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन रस्ते बांधकाम | ८००.०० लक्ष | ७८०.०० लक्ष | २५.०० लक्ष | ‘‘प्रभाग कार्यालय / इमारत बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. ७०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन रस्ते बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १० | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग | ६००.०० लक्ष | -- | ६००.०० लक्ष | संकिर्ण पृष्ठ क्र. २४<br><br>बांधकामे पृष्ठ क्र. १९<br><br>सार्वजनिक उद्याने पृष्ठ क्र. २८<br><br>बांधकामे पृष्ठ क्र. २० | B.S.U.P योजना मनपा हिस्सा<br><br>तळी, विहिरी दुरुस्ती<br><br>खेळणे इलेक्ट्रीक फिटींग<br><br>गटारे दुरुस्ती / झाकणे बसविणे | २७५.०० लक्ष<br><br>१.०० लक्ष<br><br>१०.०० लक्ष<br><br>५०.०० लक्ष | २७१.३५ लक्ष<br><br><br><br>७.६५ लक्ष<br><br>२२.३६ लक्ष | २२०.०० लक्ष<br><br>५०.०० लक्ष<br><br>१५.०० लक्ष<br><br>१५.०० लक्ष | ‘‘कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग’’ या लेखाशिर्षाखाली रु. ६००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘B.S.U.P योजना मनपा हिस्सा’’ या लेखाशिर्षाखाली रु. २२०.०० लक्ष ‘‘तळी, विहिरी दुरुस्ती’’ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष ‘‘खेळणे इलेक्ट्रीक फिटींग’’ या लेखाशिर्षाखाली रु. १५.०० लक्ष ‘‘गटारे दुरुस्ती / झाकणे बसविणे’’ या लेखाशिर्षाखाली रु. १५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १११ :-**

पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९२ :-**

**नमूना क्र. १० नियम ३०(३) पहा.**

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A.Ë . | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya- Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya- Mtcao Kca- | p`staivat vaaZIcaI r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| १ | बाजारपेठ व कत्तलखाने पृष्ठ क्र. २८ | मार्केट बांधकाम | ५२५.०० लक्ष | - | ५२५.०० लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९<br><br>सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९<br><br>रस्त्यावरील दिवाबत्ती पृष्ठ क्र. १४ | नविन रस्ते बांधकाम<br><br>नविन गटारे / नाले बांधकाम<br><br>विज बिलाचा खर्च (स्ट्रीट लाईट) | ८००.०० लक्ष<br><br>३००.०० लक्ष<br><br>७५०.०० लक्ष | ७८०.०० लक्ष<br><br>२९०.०० लक्ष<br><br>६९२.७२ लक्ष | १७०.०० लक्ष<br><br>१००.०० लक्ष<br><br>२५०.०० | मार्केट बांधकाम या लेखाशिर्षाखाली रू. ५२५.०० लक्ष एवढी तरतूद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१० पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन रस्ते बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रू १७० लक्ष ‘‘नविन गटारे / नाले बांधकाम या लेखाशिर्षाखाली रू. १०० लक्ष विज बिलाचा खर्च (स्ट्रीट लाईट) या लेखाशिर्षाखाली २५० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | विशेष निधी पृष्ठ क्र. २० | प्रभाग समिती निधी | ४००.०० लक्ष | ३.४० लक्ष | ३९६.६० लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. १९<br><br>सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा<br><br>भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम | ८००.०० लक्ष<br><br>४००.०० लक्ष | ७३०.०० लक्ष<br><br>३७०.०० लक्ष | १००.०० लक्ष<br><br>१००.०० लक्ष | प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाखाली रु. ४००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा’’ या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ३ | स्मशानभूमी पृष्ठ क्र. २८ | विद्युत दाहिनी | ५०.०० लक्ष | ३७.८० लक्ष | १२.२० लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. १९ | सार्वजनिक इमारती दुरुस्ती | ५.०० लक्ष | ८.९३ लक्ष | १०.०० लक्ष | ‘‘विद्युत दाहिनी’’ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘सार्वजनिक इमारती दुरुस्ती’’ या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | नविन शाळा इमारत बांधकाम / संगणक लॅब बांधणे. पृष्ठ क्र. ३१ | १००.०० लक्ष | १९.३४ लक्ष | ८०.६६ लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. ३० | डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल | १४००.०० लक्ष | १३९९.०० लक्ष | ६०.०० लक्ष | ''नविन शाळा इमारत बांधकाम / संगणक लॅब बांधणे.'' या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल'' या लेखाशिर्षाखाली रु. ६०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ५ | विशेष निधी पृष्ठ क्र. २० | नगरसेवक निधी | ८४०.०० लक्ष | ४१३.३४ लक्ष | ४२६.६६ लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. ३० | डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल | १४००.०० लक्ष | १३९९.०० लक्ष | १००.०० लक्ष | ''नगरसेवक निधी'' या लेखाशिर्षाखाली रु. ८४०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''डी.पी. रोड बांधकाम कर्ज / महसूल'' या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | शाळेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा पृष्ठ क्र. २१ | २५०.०० लक्ष | -- | २५.०० लक्ष | नविन विद्युत कामे पृष्ठ क्र. ३२<br><br>संकिर्ण पृष्ठ क्र. २३<br><br>संकिर्ण पृष्ठ क्र. २४ | नविन स्ट्रीट लाईट<br><br>सर्व धर्मीय उत्सव मंडप / लाईट/ इतर व्यवस्था<br><br>धोकादायक इमारती पाडणे व परिक्षण | ३५.०० लक्ष<br><br>६०.०० लक्ष<br><br>१.०० लक्ष | ३४.४७ लक्ष<br><br>५९.०० लक्ष<br><br>७.११ लक्ष | ८.०० लक्ष<br><br>२.०० लक्ष<br><br>१०.०० लक्ष | ''शाळेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा'' या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''नविन स्ट्रीट लाईट'' या लेखाशिर्षाखाली रु. ८.०० लक्ष ''सर्व धर्मीय उत्सव मंडप / लाईट/ इतर व्यवस्था या लेखाशिर्षाखाली रु. २.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच ''धोकादायक इमारती पाडणे व परिक्षण'' या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष वर्ग होण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. |
| ७ | | अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर पृष्ठ क्र. २६ | ५०.०० लक्ष | १०.३४ लक्ष | ३९.६६ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन गटारे / नाले बांधकाम | ३००.०० लक्ष | २९०.०० लक्ष | ३५.०० लक्ष | ''अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर'' या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''नविन गटारे / नाले बांधकाम'' या लेखाशिर्षाखाली रु. ३५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | सार्वजनिक तळी विहिरी सुशोभिकरण करणे | ७०.०० लक्ष | ७.४९ लक्ष | ६२.५१ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन रस्ते बांधकाम | ८००.०० लक्ष | ७८०.०० लक्ष | ५०.०० लक्ष | ‘‘सार्वजनिक तळी विहिरी सुशोभिकरण करणे’’ या लेखाशिर्षाखाली रु. ७०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन रस्ते बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ९ | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | प्रभाग कार्यालय / इमारत बांधकाम | ७०.०० लक्ष | ३.३९ लक्ष | ६६.६१ लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | नविन रस्ते बांधकाम | ८००.०० लक्ष | ७८०.०० लक्ष | २५.०० लक्ष | ‘‘प्रभाग कार्यालय / इमारत बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. ७०.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ‘‘नविन रस्ते बांधकाम’’ या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. २९ | कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग | ६००.०० लक्ष | -- | ६००.०० लक्ष | संकिर्ण पृष्ठ क्र. २४ | B.S.U.P योजना मनपा हिस्सा | २७५.०० लक्ष | २७१.३५ लक्ष | २२०.०० लक्ष | ''कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग'' या लेखाशिर्षाखाली रु. ६००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१० पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातून ''B.S.U.P योजना मनपा हिस्सा'' या लेखाशिर्षाखाली रु. २२०.०० लक्ष ''तळी, विहिरी दुरुस्ती'' या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष ''खेळणे इलेक्ट्रीक फिटींग'' या लेखाशिर्षाखाली रु. १५.०० लक्ष ''गटारे दुरुस्ती / झाकणे बसविणे'' या लेखाशिर्षाखाली रु. १५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. १९ | तळी, विहिरी दुरुस्ती | १.०० लक्ष | | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | सार्वजनिक उद्याने पृष्ठ क्र. २८ | खेळणे इलेक्ट्रीक फिटींग | १०.०० लक्ष | ७.६५ लक्ष | १५.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. २० | गटारे दुरुस्ती / झाकणे बसविणे | ५०.०० लक्ष | २२.३६ लक्ष | १५.०० लक्ष | |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. हेलन गोविंद** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११२, भाईंदर (पूर्व) विभागातील वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे.

**शरद पाटील :-**

आपण जो ठराव केला होता. भाजी मार्केटचे पैसे माफ करायचे. त्याच्यात ते ठरावामध्ये लिहिल होत की तिथे परत फेरीवाले बसू नये. तर तिथे फेरीवाले परत बसतात. बी.पी. रोडला. नवघर रोड ला. आणि मा. आयुक्त साहेबांनी केबिन रोड सांगितला होता. तर मला वाटत नाही की. तिथे आपली एकदा पण गाडी तिथे गेली.

**गणेश पाटील :-**

केबिन रोडला सोमवारी कारवाई होईल.

**शरद पाटील :-**

आणि बी.पी. रोड, नवघर रोड.

**गणेश पाटील :-**

सोमवारी कारवाई होईल. आज होणार नाही. कारण, आज काशिमिराला कारवाई करायला जायच आहे.

**शरद पाटील :-**

खांबित साहेब, बी.पी.रोड, प्रशांत हॉटेल, साईबाबा मंदिर ते व्यकंटेश्वर नगर बिल्डींग पर्यंतचा कार्यालया पर्यंत रस्ता हा वन वेच चालू आहे. माझ काय म्हणण आहे की तुम्ही रिक्षा जर वन वे केल्या तर बी.पी.रोड ला जो माणूस मध्यभागी जो उतरणार आहे तो कसा उतरेल. किंवा जाणार आहे तो कसा जाईल आजच्या तारखेला माणूस प्रवास हा रिक्षेने करतो.  त्याला जर आपण इथून रिक्षा फिरवली. गोडदेव फाटक रोड वरून कैराली अपार्टमेन्ट. गोडदेव फाटक कैराली अपार्टमेन्ट तसा घेवून नर्मदा नगरमधून केबिन रोड ने रिक्षा आली. तर बी.पी. रोडला जाणारा माणूस रिक्षेतून कसा जाईल.

**दिपक खांबित :-**

त्याला फिरून जायला लागेल. जी रिक्षा येईल ना ती फिरवून घ्यायला लागेल.

**शरद पाटील :-**

रिक्षावाला त्यांना परत तिथे सोडणार त्याच्या नंतर एम.टी,एम.टी. केबिन रोड श्रीजी अपार्टमेंटपर्यंत पर्यंत जाताना. बी.पी.रोड, प्रशांत हॉटेल, साईबाबा मंदिर ते व्यकंटेश्वर अपार्टमेन्ट. तो आमच्या तिथून आला तो साईबाबा मंदिरकडे जावून. व्यंकटेश्वर कार्यालयाच्या तिकडे परत गेला. तर तो मधल्या पट्टयातून पॅसेन्जरला जायला मिळणार नाही. ना येताना मिळणार ना जाताना मिळणार. रिक्षा पटकन जातच नाही. रिक्षेसाठी वगळून बाकी सगळ्यासाठी वन वे करा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, पश्चिमेला उत्तन पर्यंत परिवहनच्या बसेस जातात. आणि तुम्हाला माहितच असेल तिथे किती रिसॉर्ट आणि हॉटेल्स झालेले आहेत. आणि मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. आणि तिथे लोकांनी सुध्दा अतिक्रमण केलेले आहेत. आताच मगाशी विषय निघाला होता. कर वगैरे घेतात. आणि जे लोक गैर प्रकारे वागतात. त्यांत अतिक्रमण हटवण महापालिकेच कार्य आहे. ते होत नाही. मला तर वाटत मी दोन-तीन वेळा नजरेस आणल. जाधव साहेब असताना त्यांनी मला आश्वासन दिल होत. पण त्यांची बदली झाली. तर मला वाटत की, तिचे कारवाई लवकरात लवकर करावी. आणि पर्यटक येतात. दुसऱ्या शहरातून येणाऱ्या लोकांना मिरा भाईंदर महानगरपालिकेचा मॅसेज जातो. तिथे बरोबर येण्याचा. तर तिथे बाहेरून लोक आपल्या शहरात येतात ही चांगली गोष्ट ओह. म्हणून त्या अनुषंगाने आपले उत्तन रोड त्याची दुरूस्ती आणि त्याच्यामध्ये येणारे अडथळे हे लवकरात लवकर दूर करण्याचे प्रयत्न करा.

**मा. सभापती :-**

तुम्ही तक्रार केली का?

**बर्नड डिमेलो :-**

तक्रार म्हणजे मी मगाशी यादव साहेबांना तोंडी बोललो होतो.

**मा. सभापती :-**

आपल्या कामाची नोंद घेतली जाईल. जे कुठे अतिक्रमण झाल असेल. तक्रार असेल त्या पध्दतीने अधिकाऱ्यांना सांगा.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, भाईंदर परिवहनच वाहतुक सुरळीतसाठी चालल आहे. त्याच्यात मोठा डी.पी. रोड आहे. आर.एम.पी. पार्क चा. त्याची सध्याची पोजिशन काय आहे? तो जर झाला तर बराच फरक पडेल.

**अनिल सावंत :-**

हे जे भाईंदर पूर्व नवघर रोड आहे. तिथल्या एम.बी.एम.सी. च्या बस उचलून आपण जैसल पार्कला नेतो. तिथे बी.एस.टी. च्या पण बस थांबतात का? की, फक्त एम.बी.एम.सी. च्या बस थांबतात.

**दिपक खांबित :-**

बी.एस.टी. च्या बसेस नाही थांबत. त्या नवघर रोड वरून फिरून जातात.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, भाईंदर पूर्वेच वाहतुकीसाठी एक जैसल पार्कचा जो डी..पी.रोड आहे. त्याची मागच्या वेळी आपण मंजूरी पण घेतली होती. सध्या तो जर झाला तर वाहतुकीवर बराच फरक पडेल. तर त्याची सध्या पोजिशन काय आहे. मंजूरीसाठी कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड मंजूरीसाठी पाठवले. मंजूरी मिळाल्यानंतर रोड करणार ना.

**प्रविण पाटील :-**

कधी होईल? किती वेळ लागेल?

**मदन उदितनारायण सिंह :-**

खांबित साहब, कपूर टॉवर के सामने रस्ता होगा। चौपाटी जानेकी जरूरत नही होगी।

**जुबेर ईनामदार :-**

जो ठराव मांडणार ना त्याच्यामध्ये माझी सुचना आहे ती समावेश करून घ्या. मिरारोड रजास थियेटरच्या समोरचा जो रस्ता आहे तो वन वे करायचा.

**बर्नड डिमेलो :-**

आपल्या उत्तन विभागामध्ये बरीच हॉटेल्स् आणि रिसॉर्ट झालेले आहे. त्याच्यामध्ये बाहेरचे पर्यटक भरपूर येतात आणि उत्तन ते पाली या एरियामध्ये. भरपूर लोकांनी अतिक्रमण केले. घर बांधले अस म्हणता येत नाही. पण साहित्य, सामान टाकलेल आहे. पण बऱ्याच वेळा साफसफाई कामगारांना काढायला लावल तर लोक जूमानत नाही. तर मला वाटत की, त्याच्यावर कारवाई केली तर बरं होईल. आणि रस्त्याची पण हालत खराब झाले. बाहेरून शहरात येणारी लोक ....

**हेलन गोविंद :-**

साहेब, रस्त्याची हालत भरपूर खराब झाले. उत्तन ते चौक पर्यंत रस्ता होतच नाही. आणि एवढे खड्डे झालेले आहेत. ते व्यवस्थित दिसत नाही. बाहेरची लोक येतात नी बघतात ना.

**मा. आयुक्त :-**

गोखले साहेब, तुम्हाला ५ गावांचा प्रॉपर्टी टॅक्स किती आहे ह्याची माहिती काढायला सांगितलेली. पाणीपट्टी किती आहे? त्या उत्तन वर खर्च किती झाला? गोडसे सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांनी सगळा स्टाफ घेवून चार ही प्रभागाने उत्तनचे रस्ते मोकळे करायचे चार ही प्रभाग अधिकारी सर्व स्टाफ घेवून डावून डोंगरी पासून सर्व रस्ते मोकळे करायचं सर्व अतिक्रमणे काढून टाका.

**मा. सभापती :-**

किती दिवसामध्ये?

**मा. आयुक्त :-**

सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांनी. रस्ता एकदम क्लिन झालेला दिसलेला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, वाहतुक सुरळीत करण्याचा जो विषय आलेला आहे. मुळात मा. महासभेमध्ये हॉकर्स आणि नो हॉकर्स झोनचा ठराव झालेला आहे. मला असं वाटतं की, त्याची प्रभाग अधिकाऱ्यांना काही कल्पना नाही. तर मुळात फेरिवाल्यांमुळे प्रत्येक ठिकाणी जी वाहतुक कोंडी होते ती ही फेरिवाल्यांमुळे होते.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये आम्ही उपविधी तुम्हाला बनवायला दिलेली आहे. त्यामध्ये आमचा सर्व्हे झाला. सर्व्हे होवून रिपोर्ट आला. जी व्यक्ती एका कुटूंबामध्ये एकच हातगाडी आणि तो १५ वर्ष मिरा भाईंदरमध्ये राहत होता. अशा लोकांना लायसन्स इश्यु करायचा आहे आणि जे १५ वर्षानंतर आले आता ५ वर्ष झाली, २ वर्ष झाली, ८ वर्ष झाली, १० वर्ष झाली. तर त्यांना इथून लायसन्स द्यायचे नाही. त्यांची हातगाडी जप्त करुन मोडून टाकायची.

**अनिल सावंत :-**

मग ही कारवाई कधी करणार?

**मा. आयुक्त :-**

उपविधी मंजूर झाल्यावर.

**अनिल सावंत :-**

उपविधी मंजूर कधी होणार?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभे पुढे ठेवलेले आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये हो पण कन्डीशन टाका की, त्याला स्थानिक मराठी भाषा यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

तुमच्याकडून ही मागणी का?

**अनिल सावंत :-**

हो. स्थानिक भाषा मराठी यायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

माझा विरोध आहे.

**मा. आयुक्त :-**

सचिव साहेब, मिनिट्स करा. मराठी भाषा येईल त्यांनाच हातगाडीचे लायसन्स द्यायचे.

**जुबेर इनामदार :-**

माझा विरोध आहे. अशी एका सदस्याची सुचना आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सभागृह का निर्णय ऐसा कम्प्लसरी नही होना चाहिए।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता आपण भाईंदर पूर्वेचा जसा विषय घेतला. वाहतुक सुरळीत बाबत. तसा भाईंदर पश्चिम आणि मिरारोडचा विषय व्हावा अशी मी सुचना करतो.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या वेळेला विषय येणार.

**दिपक खांबित :-**

भाईंदर पश्चिमचा विषय झाला. आता परवाच्या दिवशी कोणी सुरु केलं होतं. कोंबडी गल्ली आहे, तिथे नो पार्कींगच सुरु केली आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, तुम्ही विषयाला कल्टी दिली. माझा विषय होता की, हॉकर्स आणि नो हॉकर्स झोनचा. त्यांना हटवण्याची काहीच मुळी होत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला बोला म्हणून सांगितल नाही. मी काही बोललो नाही. तुमचा विषय होता. तुम्ही घेवू का म्हणून विचारल.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेमध्ये ठराव झाला. आपण जो नो हॉकर्स झोन बनवला, सहा महिने झाले. त्याचे कम्प्लीमेन्टेशन होत नाही. प्रभाग अधिकारी काय करतात? नो हॉकर्स झोनमध्ये जो हॉकर्स बसतात.

**शरद पाटील :-**

साहेब, त्यांची गोष्ट बरोबर आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही प्रत्येक गोष्ट लाईटली का घेता?

**मा. आयुक्त :-**

सुप्रीम कोर्टाने जजमेन्ट दिले आहे. हॉकर्सना त्यांच्या ठिकाणी राहू द्या. त्यांना एकसारखा त्रास देवू नका. मुंबईला पण ती परिस्थिती झाली. सुप्रिम कोर्टाने जजमेन्ट दिले. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे उपविधी बनवा म्हणून गव्हर्नमेंटने कळवल. उपविधी आज ठेवायच उद्या ठेवायच.

**अनिल सावंत :-**

मग, गेला का?

**मा. आयुक्त :-**

यावर आम्ही मा. महासभेमध्ये विषय ठेवलेला आहे.

**अनिल सावंत :-**

त्या ठरावाला अर्थ नाही का?

**मा. आयुक्त :-**

आपण तो कायद्यात रुपांतर नाही केला. महापालिकेच्या ठरावाप्रमाणे आपण करत होतो.

**अनिल सावंत :-**

वॉर्ड ऑफीसर नाही करत. त्यांना माहितच नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, सुप्रिम कोर्टाने आदेश दिला ते आम्हाला मान्य आहे. मला एक समजत नाही की, जिथे बसतच नाही तिथे नवीन बसायला लागले. त्याच्यावर आपल्याला कसला आदेश पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

नविन बसत असेल ते काढून टाकू.

**शरद पाटील :-**

नविन वर कोण लक्ष देतं. आता मी तुम्हाला सांगतो, छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर फेरिवाले बसलेले आहेत. तर तुम्ही त्यांना किती उठवलं?

**मा. आयुक्त :-**

फेरिवाल्यांवर दररोज कारवाई करायला लागेल.

**शरद पाटील :-**

मला एक सांगा. जेव्हा पोलिसांनी इतकी धम्मक कारवाई केल्यानंतर बी.पी. रोड हा एकदम बंद झाल्या सारखाच आहे. मग, त्यांच्यावर का नाही गुन्हे दाखल करत?

**मा. सभापती :-**

पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करा.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येकावर एम.आर.टी.पी. दाखल करा. सर्व प्रभाग अधिकारी रोडवरच अतिक्रमण काढल्यानंतर सगळ्यांनी एम.आर.टी.पी. दाखल करा. म्हणजे हातगाडी परत मागायचा प्रश्नच नाही. एम.आर.टी.पी. दाखल करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, पुढच्या सभेमध्ये एम.आर.टी.पी. दाखल केलेल्याचा आढावा घेवून या.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, विचारायचं होत की, नेमकी ही रस्त्यावरची अतिक्रमणाची कारवाई आहे, ती पोलिसांची आहे की, महानरगपालिकेची आहे? पोलिस वेगळी कारवाई करते, महानगरपालिका वेगळी कारवाई करते. नेमके कारवाई कोण करते?

**मा. आयुक्त :-**

पोलिस आम्हाला बंदोबस्त देते आणि महापालिकेचा स्टाफ करतो.

**प्रविण पाटील :-**

पोलिस स्वतंत्र जातात.

**मा. आयुक्त :-**

स्वतंत्र जाता येणार नाही.

**प्रविण पाटील :-**

नेमकं काम कोणाचे आहे?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचं आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला दिपक हॉस्पीटलच्या गल्लीतले पण सांगितले. तिथे सुध्दा दोन्ही साईडला फेरिवाले बसतात.

**सुदाम गोडसे :-**

दिपक हॉस्पीटच्या गल्लीमधून २० गाड्या जमा करुन टाकलेल्या आहेत आणि एकाची गाडी उचलली की दुसरा दुसऱ्या गल्लीमध्ये जाते आणि तिथे गेलो तर दुसऱ्या गल्लीत पळतात.

**अनिल सावंत :-**

गाड्या देवू नका ना. गाड्या तोडून टाका.

**सुदाम गोडसे :-**

सर्व प्रभागामध्ये आम्ही एकत्रितरित्या कारवाई करु.

**मा. आयुक्त :-**

सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांना असे सांगितले की, गातगाडी उचलताना व्यवस्थित उचला. पण जिथे ठेवायचे आहे तिथे जोरात टाका म्हणजे ते मोडतील. म्हणजे परत मागण्याचा प्रश्नच येणार नाही. जर ते मोडलेले असेल तर ते मागायला पण येणार नाही.

**सुदाम गोडसे :-**

परवाच्या दिवशी आम्ही कारवाई करायला गेलेलो. तेव्हा तिथे १००-१५० लोक आलेली गाडी उचलायला गाड्या अडवल्या होत्या.

**अनिल सावंत :-**

पोलिस बंदोबस्त नव्हता का?

**मा. आयुक्त :-**

गाड्या जर अडवल्या तर गुन्हा दाखल करा ना.

**अनिल सावंत :-**

साहेब, मिरारोडच पुनम सागरला जातो तो १०० फुट रोड, एक साईड तर फेरिवाल्यांनी पूर्ण ब्लॉक केलेली असते आणि आपले धोरण काय आहे? तिथे रोडवर परमनन्ट जाहिरातीची कमान बांधलेली आहे. प्रभाग अधिकारी किंवा इतर अधिकारी करतात काय? त्यांच्या लक्षात येत नाही का?

**मा. आयुक्त :-**

कमानीला परवानगी दिलेली का?

**अनिल सावंत :-**

ऑगस्ट महिन्यामध्ये दिलेली आहे. मास्क इम्पॅक्ट या कंपनीला दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

सर, काशीरोडला कमानीच तशी आहे. काशीरोडला कमान आहे ना ती जवळ जवळ रस्त्यावर यायला लागले आणि एका साईडला ॲड केलं.

**अनिल सावंत :-**

तुमचं धोरण कुठे ठरल? मंजूरी कोणाची घेतली?

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समितीमध्ये तर विषय आला नव्हता.

**अनिल सावंत :-**

साहेब, त्या कमानीमुळे तुमचा रस्ता खोदला. डिव्हायडर तोडला. तुमची परवानगी घेतली होती का?

**स्वप्नील सावंत :-**

साहेब, तिथे लोखंडी कमान आहे ना.

**अनिल सावंत :-**

लोखंडी परमनन्ट कमान आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही परवानगी केव्हा दिली?

**स्वप्नील सावंत :-**

ऑगस्ट महिन्यामध्ये दिली. स्टॅन्डीगमध्ये ठराव झालेला त्या अनुषंगाने दिली.

**अनिल सावंत :-**

स्टॅन्डीगमध्ये जो ठराव झालेला तो स्पेसीफिक पाच कमानीसाठी ठराव झालेला. ठराव काढून बघा.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे तुम्ही लावलेल्या कमानीची अडचण होत नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्ही मेनरोडला लावलेल्या आहेत. आम्ही लावलेल्या नाही. मुख्य रस्त्यावर लावलेल्या आहे. हा इन्टरनल रस्ता आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण पाहणी करु.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा. तुम्ही डिव्हायडर खोदला, रस्ता खोदला, तुमची परवानगी घेतली. महापालिकेकडे पैसे भरले.

**मा. आयुक्त :-**

दि. ०३/०२/२००९ ला जाधव साहेबांनी परवानगी दिली. जाधव साहेबांनी परवानगी दिल्यानंतर माझ्या टेन्युअरमध्ये त्याचे ॲग्रीमेंट झाले.

**अनिल सावंत :-**

साहेब, पाहणी करुन घ्या. संपूर्ण तोडफोड केले. तिथे ऑलरेडी ट्राफीक असते.

**मा. आयुक्त :-**

त्या कमानीमुळे ट्राफीक वगैरे अडते का ते बघून या. ट्राफीक पोलिसांना दाखवा. अडतं का विचारा. कारण तीन वर्षाचे ॲग्रीमेंट केले. पैसे भरुन घेतलेल आहे.

**अनिल सावंत :-**

स्थायी समिती समोर तरी यायला पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

महापालिकेला इन्कम जास्त मिळत असेल.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेला इन्कम जास्त महत्वाचे नाही.

**अनिल सावंत :-**

लोकांना त्रास होवून इन्कम होत असेल तर त्याचा काय उपयोग आहे.

**मा. आयुक्त :-**

त्रास होतो का ते ट्राफीक पोलिसांकडून तपासून घ्या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तो पुनम सागरचा मुख्य रस्ता आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपेक्षित खर्चास मंजूरी, म्हणजे किती खर्च अपेक्षित आहे?

**दिपक खांबित :-**

साहेब, दोन-एक वर्ष माहित नव्हते. एका बाजूला जवळ जवळ १४ ते २० हजार रु. खर्च होतो. म्हणजे वर्षभरात लाखापर्यंत खर्च होईल.

**जुबेर इनामदार :-**

नो इन्ट्री बोर्डवर.

**दिपक खांबित :-**

हो. नो इन्ट्री बोर्डवर.

**अनिल सावंत :-**

संपूर्ण शहरामध्ये लावा. फक्त भाईंदर पूर्वेला लावू नका. नो पार्कींग, वन वे वगैरे हे जे बोर्ड आहे ना, नो हॉकर्स हे संपूर्ण शहरात लावा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हा विषय जो काढला ना, त्याचा मेन रोड जो आहे ना तो बाजाराने भरलेलाच असतो. ते हॉकर्स चालायला रस्ता सुध्दा सोडत नाही. स्टेशनच्या बाहेरचा तो रस्ता आहे. स्काय वॉक झाल्यामुळे लोक स्काय वॉकवर तोंडावर येवून उभे रहायला लागले.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेब, भाईंदर पश्चिमेमध्ये श्रध्दा हॉस्पीटल आहे ना तिथे नो इन्ट्री आहे. तर तिथे वन वे सुध्दा नको.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्या पालिके समोर कोंबडी गल्लीमध्ये वन वे चा बोर्ड लावलेला आहे. पण तिथे टू वे चालू आहे.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) भागातील रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहतूक व रहदारी असल्याने ट्राफिक जॅम होत असते. याबाबत दि. २७/११/२००९ रोजी आयुक्त यांच्या दालनात मा. पोलिस निरीक्षक, नवघर पोलिस स्टेशन, वाहतूक शाखेचे अधिकारी, रिक्षा, टेम्पो संघटना यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत सर्व संमतीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

१) भाईंदर (पूर्व) फाटक येथील टेम्पो स्टॅन्ड गोल्डन नेस्ट ३०.०० मीटर रस्त्यावर मस्जिद पासून मागे करण्यात यावा.

२) भाईंदर (पूर्व) नवघर रोड वर बंदरवाडी नाल्यावर MBMC बस उभ्या राहून वाहतूकीची कोंडी होत असल्याने सदर बसेस तात्पूरत्या जैसल पार्क चौपाटीवरुन फिरवून रेल्वे समांतर रस्त्यावर उभ्या कराव्यात. तदनंतर रिलायन्स सब स्टेशन जवळील अतिक्रमण हटवून सदर रस्ता रेल्वे समांतर रस्त्यास जोडून सदर रस्त्यावरुन बसेस रेल्वे समांतर रस्त्यावर नेऊन ठेवण्यात याव्यात.

३) गोडदेव फाटक रोडवर दिवसा मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असल्याने सदर रस्ता सकाळी १०.०० ते रात्री १०.०० पर्यंत No Parking करण्याकरीता रस्त्यावर फलक लावावेत व पोलीसांनी सदर रस्त्यावर गाडया उभ्या राहू नयेत याची दक्षता घ्यावी.

४) भाईंदर (पूर्व) भागातील वाहतूकीची कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने रिक्षा करीता खालील प्रमाणे एकेरी मार्ग करण्यात यावेत.

अ) गोडदेव फाटकरोड वरुन कैराली अपार्टमेंट

ब) एम.टी.एम. ते केबिन रोड श्रीजी अपार्टमेंट ते रामगोपाल सदर रस्ता. (रिक्षा करीता वगळून)

क) बी.पी रोड प्रशांत होटल साईबाबा मंदिर ते व्यंकटेश्वर बिल्डरच्या कार्यालयापर्यंतचा रस्ता. (रिक्षा करीता वगळून)

ड) नवघर रोड शनी मंदिर जवळील रस्ता (नवघर रोड ते स्टेशन कडे जाणारा रस्ता)

इ) स्टेशन रोडवर रंजन बार समोरील एंट्री बंद करणे व ATM हटविणे करीता रेल्वेस कळविले अथवा रिक्षा करीता दोन्ही ठिकाणाहून रस्ता ठेवणे.

ई) नवघर रोड सुजाता शॉपिंग सेंटर ते डीजी मार्केट ते स्टेशन रस्ता.

उ) नवघर रोड सरस्वती नगर रस्ता आर.एन.पी. पार्क बांगापांगा कडे जाणाऱ्या रस्त्यास जोडून S.V रोडला समांतर रस्ता तयार करुन दोन्ही रस्त्यावर रिक्षा करीता वाहतूक एकरी सुरु करणे.

ऊ) बी.पी रोड विजय पंजाब समोरील अतिक्रमण, प्रशांत हॉटेल समोरील इमारती भागातील चप्पल

दुकान व इतर अतिक्रमण काढणे.

ऐ) विमल डेअरी येथील व रस्त्यावरील सर्व विदयुत पोल, जंक्शन बॉक्स हटविणे.

फ) शिर्डी नगर पोलिस चौकी शेजारुन सुयश गल्ली ते नवघर रोड एकेरी मार्ग करणे.

ह) वरील सर्व मार्गावरील खड्डे बुजविणे.

ग) सर्व रस्त्यावर रिक्षाकरीता एकेरी मार्ग असे फलक बसविणे.

र) रसाज सिनेमा गृह समोरचा रस्ता वनवे करणे.

क्ष) १०० फुट रोड अतिक्रमण हटवून वाहतुक सुरळीत करणे.

स) शांतीनगरमधील पदपाथ मोकळा करुन वाहतुक सुरळीत करणे, सृष्टी आय.सी.आय.सी.आय. बँक समोरील पार्कींग हटवून समोर करणे.

प) ना फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी करणे.

वरीलप्रमाणे उपाययोजना करण्यास आवश्यक ते फलक बसविण्यास रु. २५.०० लक्ष पर्यंत खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**शरद पाटील :-**

साहेब, जो टेम्पो आपण गोल्डन नेस्टच्या ३० मी. वर घेवून जातो. उद्या घोडबंदरचा रस्ता चालू झाला तर तिथे परत ट्राफीक चालू होईल. त्याच्यामुळे आपल्याला टेम्पो स्टॅन्डसाठी चांगली जागा आहे. आपले फ्लाय ओव्हर आणि पाणीच्या टाकीच्या मधल्या भागात जी जागा आहे तिथे नेलं तर अती उत्तम होईल अशी माझी सुचना आहे. योग्य असेल तर तिथे न्या. नाही तर इथून हलवण्या पेक्षा तिथे गेल्यानंतर परत हलवायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

मी तेच सुचवले आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, तिथे जात नाही ना.

**शरद पाटील :-**

जात नाही म्हणजे काय? पोलिस देतील ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मिरारोड परिसरामध्ये काही लोकांनी जुन्या गाड्या रस्त्यावर आणून ठेवलेल्या आहेत. रिसेलसाठी. एक एक दुकानाच्या समोर ५०-५० गाड्या ठेवलेल्या आहेत. त्यामुळे वाहतुकीचा फार अडथळा निर्माण होतो. तर मागच्या मिटींगमध्ये हा विषय झाला होता. परंतु, त्या गाड्यांवर अजून काही कारवाई झाली नाही.

**मा. आयुक्त :-**

सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी लक्षात घ्या. रात्री हातगाड्या तिथेच जातात. फक्त माल हातगाडीवर जातो. रात्री एक दिवस फिरा म्हणजे सर्व हातगाड्या फिरतील.

**मा. सभापती :-**

सर्व सुचनांसह प्रकरण क्र. ११२ हे सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ११२ :-**

भाईंदर (पूर्व) विभागातील वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे.

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) भागातील रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहतूक व रहदारी असल्याने ट्राफिक जॅम होत असते. याबाबत दि. २७/११/२००९ रोजी आयुक्त यांच्या दालनात मा. पोलिस निरीक्षक, नवघर पोलिस स्टेशन, वाहतूक शाखेचे अधिकारी, रिक्षा, टेम्पो संघटना यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत सर्व संमतीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

५) भाईंदर (पूर्व) फाटक येथील टेम्पो स्टॅन्ड गोल्डन नेस्ट ३०.०० मीटर रस्त्यावर मस्जिद पासून मागे करण्यात यावा.

६) भाईंदर (पूर्व) नवघर रोड वर बंदरवाडी नाल्यावर MBMC बस उभ्या राहून वाहतूकीची कोंडी होत असल्याने सदर बसेस तात्पूरत्या जैसल पार्क चौपाटीवरुन फिरवून रेल्वे समांतर रस्त्यावर उभ्या कराव्यात. तदनंतर रिलायन्स सब स्टेशन जवळील अतिक्रमण हटवून सदर रस्ता रेल्वे समांतर रस्त्यास जोडून सदर रस्त्यावरुन बसेस रेल्वे समांतर रस्त्यावर नेऊन ठेवण्यात याव्यात.

७) गोडदेव फाटक रोडवर दिवसा मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असल्याने सदर रस्ता सकाळी १०.०० ते रात्री १०.०० पर्यंत No Parking करण्याकरीता रस्त्यावर फलक लावावेत व पोलीसांनी सदर रस्त्यावर गाडया उभ्या राहू नयेत याची दक्षता घ्यावी.

८) भाईंदर (पूर्व) भागातील वाहतूकीची कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने रिक्षा करीता खालील प्रमाणे एकेरी मार्ग करण्यात यावेत.

अ) गोडदेव फाटकरोड वरुन कैराली अपार्टमेंट

ब) एम.टी.एम. ते केबिन रोड श्रीजी अपार्टमेंट ते रामगोपाल सदर रस्ता. (रिक्षा करीता वगळून)

क) बी.पी रोड प्रशांत होटल साईबाबा मंदिर ते व्यंकटेश्वर बिल्डरच्या कार्यालयापर्यंतचा रस्ता. (रिक्षा करीता वगळून)

ड) नवघर रोड शनी मंदिर जवळील रस्ता (नवघर रोड ते स्टेशन कडे जाणारा रस्ता)

इ) स्टेशन रोडवर रंजन बार समोरील एंट्री बंद करणे व ATM हटविणे करीता रेल्वेस कळविले अथवा रिक्षा करीता दोन्ही ठिकाणाहून रस्ता ठेवणे.

ई) नवघर रोड सुजाता शॉपिंग सेंटर ते डीजी मार्केट ते स्टेशन रस्ता.

उ) नवघर रोड सरस्वती नगर रस्ता आर.एन.पी. पार्क बांगापांगा कडे जाणाऱ्या रस्त्यास जोडून S.V रोडला समांतर रस्ता तयार करुन दोन्ही रस्त्यावर रिक्षा करीता वाहतूक एकरी सुरु करणे.

ऊ) बी.पी रोड विजय पंजाब समोरील अतिक्रमण, प्रशांत हॉटेल समोरील इमारती भागातील चप्पल दुकान व इतर अतिक्रमण काढणे.

ऐ) विमल डेअरी येथील व रस्त्यावरील सर्व विदयुत पोल, जंक्शन बॉक्स हटविणे.

फ) शिर्डी नगर पोलिस चौकी शेजारुन सुयश गल्ली ते नवघर रोड एकेरी मार्ग करणे.

ह) वरील सर्व मार्गावरील खड्डे बुजविणे.

ग) सर्व रस्त्यावर रिक्षाकरीता एकेरी मार्ग असे फलक बसविणे.

र) रसाज सिनेमा गृह समोरचा रस्ता वनवे करणे.

क्ष) १०० फुट रोड अतिक्रमण हटवून वाहतुक सुरळीत करणे.

स) शांतीनगरमधील पदपाथ मोकळा करुन वाहतुक सुरळीत करणे, सृष्टी आय.सी.आय.सी.आय. बँक समोरील पार्कींग हटवून समोर करणे.

प) ना फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी करणे.

वरीलप्रमाणे उपाययोजना करण्यास आवश्यक ते फलक बसविण्यास रु. २५.०० लक्ष पर्यंत खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दि. सावंत** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११३, भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथे शवागृहात शितशवपेटी Mortuary Cabinet बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**अनिल सावंत :-**

साहेब, मिरारोडच हॉस्पीटल होवून मशीन्स आलेल्या आहेत. १६ कॅबिनेट, ६ महिने झाले. आपण तो तरी चालू करुन शकतो ना. त्याचे एसी फिटींग्स लावलेले असेल. आता खराब झाला असेल, सडली असेल. ते तरी चालु करुन घ्या. हॉस्पीटल होईल तेव्हा होईल. लोकांची फार गैरसोस होते.

**ग्रिटा फॅरो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथे शवागृहाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. सदर शवागृहामध्ये शव जतन करणे कामी शीतशवपेटी Mortuary cabinet ची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यानुसार रूग्णालयांमध्ये प्रेते काही काळा पुरती सुस्थिती ठेवण्यात येतात. सदर शीतशवपेटी संपूर्ण कार्यक्षमतेने वापरात ठेवण्यासाठी स्वतंत्र व बंदिस्त हॉस्पीटलच्या एका बाजूला एक खोली बांधण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी ३ रॅकच्या ७ शीतशवपेट्या बसविणे कामी रू. ३०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "हॉस्पीटल बांधकाम" या लेखाशिर्षकाखाली पुरेशी तरतुद आहे.

तरी सदर कामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११३ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथे शवागृहात शितशवपेटी Mortuary Cabinet बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथे शवागृहाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. सदर शवागृहामध्ये शव जतन करणे कामी शीतशवपेटी Mortuary cabinet ची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यानुसार रूग्णालयांमध्ये प्रेते काही काळा पुरती सुस्थिती ठेवण्यात येतात. सदर शीतशवपेटी संपूर्ण कार्यक्षमतेने वापरात ठेवण्यासाठी स्वतंत्र व बंदिस्त हॉस्पीटलच्या एका बाजूला एक खोली बांधण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी ३ रॅकच्या ७ शीतशवपेट्या बसविणे कामी रू. ३०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "हॉस्पीटल बांधकाम" या लेखाशिर्षकाखाली पुरेशी तरतुद आहे.

तरी सदर कामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११४, निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**याकुब कुरेशी :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च/ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १. | भाईंदर (प.) भोलानगर येथील उजव्या बाजूचा रस्ता तयार करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ४९,९९,९००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| २. | भाईंदर (प.) भोलानगर येथील डाव्या बाजूचा रस्ता तयार करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ४९,९९,९००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ३. | भाईंदर (प.) भोलानगर येथील रस्त्यावर डिव्हाडर बसविणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. १३,२१,६००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ४. | भाईंदर (पूर्व) पांचाळ इंडस्ट्रीयल मधील गॅलेक्सी थर्मो पासुन अंबिका फिटींगस व पुजा ट्रेडर्स पासून कलाकार निवास पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. तसेच पांचाळ नगर अर्धवट डी.पी.रोड करीता आवश्यक कामे करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ३९,७५,२००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निवीदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र. १ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा, अ.क्र. २ च्या

कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा , अ.क्र. ३ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा ह्या वाजवी असून सदर निविदांना मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी ठेकेदारांना वेळोवेळी देयके प्रदानास देखिल मान्यता येत आहे.

**अनिल सावंत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**बर्नट डिमेलो :-**

साहेब, क्वालीटी आणि ह्याच्यावर काही डिसकस होवू शकते का? जे रस्ते आणि ह्या सगळ्या गोष्टी आपण करतो, मंजूरी देतो. त्याच्या क्वालीटीवर विचार केला पाहिजे. असं मला तरी वाटतं. २-२ वर्ष कोणताही रस्ता टिकत नाही.

**मा. आयुक्त :-**

करारनाम्यात ३ वर्षांची गॅरन्टी घाला.

**शरद पाटील :-**

साहेब, ३ वर्षांची गॅरन्टी घातली तर त्याच्यावर लक्ष कोण देणार?

**मा. आयुक्त :-**

त्याचा डिफॉल्ट शिल्लक असतो. त्याचे बील पेमेन्ट होत नाही. काशिमिरा रोड त्यच पध्दतीने केला.

**बर्नड डिमेलो :-**

त्यांनी त्याच्या क्वालीटीची हमी द्यायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

साहेब बरोबर आहे. पण त्याच्यावर लक्ष कोण देतं? ते तीन वर्षात खराब होतो की, सहा महिन्यात होतो.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे याचा अर्थ असा की, तुम्ही प्रत्येक वेळी सांगायला येता मग आम्ही करतो. म्हणजे आम्ही बघतच नाही. म्हणजे तुमचा पाय आतापर्यंत खड्ड्यात गेला असता.

**शरद पाटील :-**

साहेब, तो तसाच विषय आहे. साहेब, आम्ही तुम्हाला पूर्ण क्रेडीट देतो. तुमचं लक्ष सर्वांवर असत. तरीसुध्दा मी तुम्हाला आता चॅलन्ज देवून सांगतो. रिलायन्सवाल्यांनी सांगितलं १०० मि. खोदकाम त्याच्यापेक्षा जास्त आहे आणि परमिशन १०० मि. ची आहे.

**दिपक खांबित :-**

आपण त्यांना रिवाईज देत होतो ना.

**शिवाजी बारकुंड :-**

मी १०० मी. ची परवानगी दिली असती आणि नंतर त्यांचा फायनल काम ज्यावेळेला असत त्यावेळेस आपले इंजिनिअर आणि त्यांचे इंजिनिअर.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही या सगळ्या माहिती मागत रहायच्या का?

**शिवाजी बारकुंड :-**

प्रोसेस असते.

**शरद पाटील :-**

प्रोसेस जरी असली. तरी किती मागायला पाहिजे. वाढीव काम......

**मा. आयुक्त :-**

तुम्ही असं कस एवढ मर्यादित बोलता. एकदा दवाखान्याची औषधे खरेदी केली, करारनामा केला, ॲग्रीमेंट केले. जसं जसं औषध कमी पडतात. तस तसे औषधे मागवतो ना. थोडस ब्रॉड माईन्डेड रहायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

आम्ही ब्रॉड माईन्डेड आहोत.

**मा. आयुक्त :-**

आता आम्ही परवानगी दिली. १०० मी. ची त्यांनी खोदाई केली १२० मी. १२० चे पैसे ह्यांच्याकडून भरुन घेणार.

**शरद पाटील :-**

तुमच्या मते वाढीव काम जे व्हायला पाहिजे ते किती व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

किती वाढले ते बघून या.

**दिपक खांबित :-**

साहेब, ते आता बोलले. पण तस काही होत नाही. खोदाई अस कधी तरी होते आणि जेव्हा एक्सट्रा खोदाई होते. तेव्हा आपण पून्हा मेजरमेन्ट घेतो आणि त्या प्रमाणे पैसे वसूल करतो.

**याकुब कुरेशी :-**

आणि कमी झाल तर पैसे परत देता.

**दिपक खांबित :-**

नाही. पैसे परत देत नाही. तस होत नाही. साहेब, आतापर्यंत आपण त्यांच्याकडून ६ कोटी रु. वसूल केलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

८ कोटी रु. पेक्षा जास्त खर्च झाला नाही.

**दिपक खांबित :-**

८ कोटी रु. पर्यंत खर्च होतो. त्यांच्या पैशातून आपल्या पाणी पुरवठ्याच्या लाईन, रस्ते दुरुस्त ते पण आपण कवर करतो.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, क्वालीटीच्या बाबतीत महापालिकेच्या कॉन्ट्रॅक्टरसाठी अटीशर्ती काय आहेत आणि कशा आहेत? त्या कशा तपासून बघाव्या. आपले इंजिनिअर कॉन्ट्रॅक्टरच्या बरोबर येतात. मोजणी करुन शेरा मारुन त्यांच पेमेन्ट देवून मोकळे होतात. नंतर दोन वर्षांनी नागरिक आम्हालाच सांगतात. परत खड्डे पडले. नगरसेवकांनी पैसे खाल्ले म्हणून अशी काम झाली.

**दिपक खांबित :-**

क्वालीटीचा रिपोर्ट आल्याशिवाय आपण बिलच देत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मग ते क्वालीटीचे अटीशर्ती, नियम आम्हाला माहित पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

तुम्हाला नंतर देतो.

**बर्नड डिमेलो :-**

रस्ता किती फुटाचा असावा? कॉक्रींट किती इंचाचे टाकावा त्याच्यामध्ये सलीया टाकायचा की नाही? किंवा कसे? झाकण किती महिन्यात तुटले तर त्यांनी फुकटमध्ये द्यावे किंवा काय? त्याची आम्हाला माहिती पाहिजे.

**दिपक खांबित :-**

तुम्हांला माहिती देतो ना. किती महिन्याची माहिती पाहिजे?

**बर्नड डिमेलो :-**

किती वर्ष झाले तुम्ही त्यांच्याकडून मागतात?

**दिपक खांबित :-**

६ महिन्यांची गॅरन्टी असते.

**बर्नड डिमेलो :-**

६ महिन्यासाठी गॅरन्टी. आपण एवढे करोड रु. संपवायचे. ६-६ महिन्याचे रोड केले आणि ५ वर्षात १० वेळा रस्ता केला तर तर किती पैसे जातील?

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्हाला माहिती देतो ना.

**बर्नड डिमेलो :-**

माहिती नको. क्वालीटी पाहिजे. नाही तर कॉन्ट्रॅक्ट देवून त्याचा अर्थ काय?

**दिपक खांबित :-**

क्वालीटी शिवाय कामच होत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

कुठली क्वालीटी आहे? मला तुम्ही एक तरी सांगा, मग ती उत्तनमध्ये असो किंवा भाईंदरमधली असो.

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्ही एक रस्ता दाखवा. कुठले केलेले आहे, एक वर्ष अगोदर.

**बर्नड डिमेलो :-**

त्यांना तुम्ही अटीशर्ती घालाव्या आणि त्याच्यात सुधारावं. नाही तर दरवर्षी तेच रस्ते रिपेअर करा. आता साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ३ वर्षांची गॅरेंटी घेतील त्या कॉन्ट्रॅक्टरने कॉन्ट्रॅक्ट घ्यावे. अन्यथा सोडून द्यावे.

**दिपक खांबित :-**

आपण काशिमिरा रोड केला होता तेव्हा ३ वर्षाची गॅरेंन्टी घातली होती.

**बर्नड डिमेलो :-**

मग, तस सगळ्या ठिकाणी करा ना. मग ते छोटे रस्ते असो, गटार असो किंवा झाकण असो, झाकणसुध्दा ३ वर्षाच्या आत तुटल तर ते कॉन्ट्रॅक्टरने दुसरे बसवावे.

**मा. आयुक्त :-**

३ वर्षाची गॅरेन्टी घालायची.

**मदन उदितनारायण सिंह :-**

प्रत्येक गोष्टीला ३ वर्षाची गॅरेन्टी घालायची.

**बर्नड डिमेलो :-**

३ वर्षाच्या आत जर झाकण तुटल तर कॉन्ट्रॅक्टरने मोफत झाकण बसवावे.

**मा. आयुक्त :-**

३ वर्षाची गॅरेन्टी राहिली तर परत खर्च करायला लागल तर तो चांगलाच करतो.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मिरा भाईंदर शहराला जो पाणी पुरवठा होतो टेमघरमधून, तो विदाउट फिल्टरेशन पाणी येतो असा एक रिपोर्ट होता. ती खरी आहे का आणि वस्तुस्थिती काय आहे? त्यामुळे शहरामध्ये रोगराईचे प्रमाण वाढलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

२३ डिसेंबर ते पुढे १२ दिवस प्रि-क्लेरिनेशन बंद होतं. त्या ठिकाणी १३ तारखेला मी ही गेलो होतो. त्याबाबत सविस्तर स्टेमबाबत आम्हाला आज संध्याकाळ पर्यंत लेखी द्या. असे त्यांना आम्ही सांगितलं. आमच्याकडे वस्तुस्थिती काय झालेली आहे आणि त्याप्रमाणे लेखी कळवले आहे ते पण आपल्या सर्वांनी कळवलं जाईल.

**अनिल सावंत :-**

नंतर पण कळवाल. पण विदाउट फिल्टरेशन पाणी शहराला पुरवठा होत होतं ही वस्तुस्थिती आहे का?

**प्रविण पाटील :-**

फिल्टरेशन प्लान हा एक वर्ष झालं बंद आहे ते.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

गेले वर्षभर पाण्यामध्ये औषध टाकलेले नाही.

**अनिल सावंत :-**

वस्तुस्थिती काय आहे ते आम्हांला सांगा ना.

**शिवाजी बारकुंड :-**

वस्तुस्थिती अशी आहे की पाणी शुध्द करण्याच्या तीन-चार प्रक्रिया आहेत. त्यापैकी एखादी प्रक्रिया बंद असेल, पण दुसऱ्या प्रक्रियेने शुध्दीकरण करुन पाणी येत होत आणि इनॲडीशन टू आपल्या टाकीवर पण फ्लोरिनच बुष्टीनचा डोस असतो. जरी त्यांच्याकडून पाणी पातलीपाड्याकडून चेक होतं. एम.बी.आर. ला चेक होते, टेमघरला चेक होते आणि आपल्या टाकीच्या तिथे पण पाणी चेक करतो.

अनिल सावंत :-

तुम्ही पाणी कसं चेक करता?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण सॅम्पल घेतो आणि ते सॅम्पल कोकण राज्य शासनाची जी लॅब आहे त्यांच्यांकडे देतो आणि त्यांच्याकडून रिपोर्ट आपण आणतो.

अनिल सावंत :-

किती दिवसातून चेक करता? डेली चेक करता का?

**शिवाजी बारकुंड :-**

डेली चेक करतो. २० ते २५ रिपोर्ट रोज जातात. २ माणसं आपली कोकण भवनला रोज सगळे सॅम्पल घेवून चेकींगसाठी जातात.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये जे पेड आहेत ना ते दुरुस्त करायचे होते आणि दुसऱ्या पेडमधून क्लेरिनेशन करुन पाठवत होते. दुरुस्ती होईपर्यंत थोड क्लेरिनेशन इकडे वाढवले आणि ते तपासणी करुनच लोकांना दिलेले आहे आणि सर्वांना माहिती पाहिजे की शहाड, टेमघर प्राधिकरणाकडून आपण ३ लोक पाणी घेतो. ठाणे महानगरपालिका पाणी घेते, भिवंडी घेते आणि आपण घेतो. तर आपल्या मिरा भाईंदर महापालिका हद्दीमध्ये रोगराई पसरली, पाणी दुषीत येत असे जर म्हणायला लागलो. एक ही रोगराईची केस आपल्याकडे नाही आणि जर ती पसरली असे समजायचे असेल तर तिन्ही गावाला एकच वेळेला यायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

तिकडे तर केसेस असतील ना तिथे प्रायव्हेट डॉक्टरकडे केसेस जात असतील.

**मा. आयुक्त :-**

नाही. म्हणजे दुरुस्तीसाठी २३ डिसेंबर ते ६ जानेवारी पेड रिपेअर करायचं होते. व्हॉल बदलायचे होते.

**अनिल सावंत :-**

मग, मिटींगला तुम्ही स्पष्टीकरण द्या ना.

**मा. आयुक्त :-**

स्पष्टीकरण म्हणजे मिडीयाला एवढच सांगितले की, आम्ही स्टेमची मिटींग ठेवलेली आणि वर्षभर बंद आहे का त्याची चौकशी करुन गुपीत माहिती सांगणार नव्हतो. त्यांच्याकडून काढणार होतो. निलंबित करणार होतो ही वस्तुस्थिती आहे.

**प्रकरण क्र. ११४ :-**

निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९५ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च/ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १. | भाईंदर (प.) भोलानगर येथील उजव्या बाजूचा रस्ता तयार करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ४९,९९,९००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| २. | भाईंदर (प.) भोलानगर येथील डाव्या बाजूचा रस्ता तयार करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ४९,९९,९००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ३. | भाईंदर (प.) भोलानगर येथील रस्त्यावर डिव्हाडर बसविणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. १३,२१,६००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ४. | भाईंदर (पूर्व) पांचाळ इंडस्ट्रीयल मधील गॅलेक्सी थर्मो पासुन अंबिका फिटींगस व पुजा ट्रेडर्स पासून कलाकार निवास पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. तसेच पांचाळ नगर अर्धवट डी.पी.रोड करीता आवश्यक कामे करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ३९,७५,२००/-<br><br><br><br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| **अ.क्र.** | **कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च/ठेकेदाराने सादर केलेले दर** |
| १. | भाईंदर (प.) भोलानगर येथील उजव्या बाजूचा रस्ता तयार करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ४९,९९,९००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| २. | भाईंदर (प.) भोलानगर येथील डाव्या बाजूचा रस्ता तयार करणे. | रू. ४९,९९,९००/- |

| | | |
|---|---|---|
| | १) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | ९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ३. | भाईंदर (प.) भोलानगर येथील रस्त्यावर डिव्हाडर बसविणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. १३,२१,६००/-<br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |
| ४. | भाईंदर (पूर्व) पांचाळ इंडस्ट्रीयल मधील गॅलेक्सी थर्मो पासुन अंबिका फिटींगस व पुजा ट्रेडर्स पासून कलाकार निवास पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. तसेच पांचाळ नगर अर्धवट डी.पी.रोड करीता आवश्यक कामे करणे.<br>१) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** | रू. ३९,७५,२००/-<br><br><br><br><br>९.००% जास्त दराने<br>१०.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराने** |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निवीदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र. १ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा , अ.क्र. ३ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा ह्या वाजवी असून सदर निविदांना मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी ठेकेदारांना वेळोवेळी देयके प्रदानास देखिल मान्यता येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी** **अनुमोदन :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११५, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर लॅण्डफील साईट तयार करणेकामी प्राप्त निवीदांना मंजुरी मिळणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

महापालिका क्षेत्रात मौजे उत्तन येथे मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून प्राप्त जागेवर बांधा वापरा व हंस्तातरित करा या तत्वावर मे. हेंजर बायोटेक मिरा यांच्यातर्फे महापालिकेकरिता घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदरचा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मे २००८ पासुन कार्यान्वित झाला आहे.

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पुनःश्च तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने सुचविलेल्या सुचना व शिफ़ारशींची कार्यवाही करणेबाबत महापालिकेस कळविले आहे. महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणा-या घनकच-यावर प्रकल्पात प्रक्रियेनंतर निघणारे १९% रिजेक्ट मटेरियलचे प्रमाण निश्चित केले आहे. त्यानुसार महापालिकेने घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातून निघणा-या १९% रिजेक्ट मटेरियलयची अंतिम विल्हेवाट लावणेकरिता घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार बांधा वापरा व हंस्तातरित करा या तत्वावर लॅंडफ़ील साईट तयार करणेकरिता निविदा मागविल्या होत्या. विहित मुदतीत तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी **मे. हेंजर बायोटेक मिरा** यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर दोन निविदाकारांनी निविदेत सादर केलेल्या दराच्या तुलनेत सर्वात कमी आहेत.

**मे. हेंजर बायोटेक मिरा** यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे. तसेच दर तीन वर्षांनी दरात १०% वाढ करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**अनिल सावंत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

याच्यामध्ये बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा. याचा अर्थच आम्हाला समजला नाही. आपल्याला त्यांना पैसे द्यायचे आहेत तर त्यांना हस्तांतरणची काय गरज आहे?

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते हेडलाईन घेतलेली आहे. बांधा वापरा हस्तांतरण करा या तत्तावर राबवलेल्या प्रकल्पांच्या ठिकाणी लॅन्डफिल साईट डेव्हलपमेंट करायची आहे.

**शरद पाटील :-**

साहेब माझ्या माहिती नुसार आणि जोपर्यंत मला आठवतं त्यांच्यानुसार जेव्हा या ठेकेदाराला आपण करायला दिले होते, त्यांनी सांगितले होते की, ह्याच्यातून १ टक्काही वेस्टेज कचरा निघणार नाही आणि जर निघाला तर त्याचा बंदोबस्त मी करेन असे झाले होते. मागची प्रोसेडींग काढून बघा. मागचा ठराव काढा.

**मा. आयुक्त :-**

भारतामध्ये कुठलीही प्रोसेस अशाच पध्दतीने होते.......

**शरद पाटील :-**

साहेब, त्यावेळेला आम्ही पण तो विचार केला असे होवू शकत नाही. पण त्यांनी सांगितले की, आम्ही करुन देवू.

**हेलन गोविंद :-**

मा. सभापती साहेब, या ठरावाला आमचा विरोध आहे. कारण सध्या पर्यायी जागा बघत आहे ना. मग, पून्हा हा विषय का आला? आमचा विरोध नोंदवा.

**मा. आयुक्त :-**

कुठल्याही प्रक्रिया करत असताना १९ टक्के शिल्लक राहते. त्याचे लॅन्डफिल साईट म्हणून युज करायचे आहे.

**शरद पाटील :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण तुम्ही मागचा ठराव काढून बघा. त्यावेळेला त्या विषयावर एवढी चर्चा झाली होती.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे मला असे सांगायचे आहे की, आपले काम बंद असताना आपण हा विषय मंजूर करतो.

**बर्नड डिमेलो :-**

लोकांचे आंदोलन चालू असताना विषय पुढे ढकलला असता तर बरं झाले असते. कारण......

**मा. आयुक्त :-**

शासनाने ज्यावेळेला आम्हाला आदेश दिला त्यावेळेला शासनाने आम्हाला कंडीशन घातली. प्लॅन्ट बघण्यासाठी तज्ञ कमिटी आली. तज्ञ कमिटीने काय काय करायचे जे सुचवलेले आहे ते सुचवलेले आम्ही ॲग्रीमेंटमध्ये करुन ठेवणार. प्लॅन्ट सुरु झाल्यानंतर हे इम्प्लीमेंट होणार. समजा, तुमच्या म्हणण्याप्रमाणे जागा चेंज झाली आणि मा. महासभेने चेंज करायला मंजूरी दिली ह्याला मा. महासभेची मंजूर लागणार. जागा सिलेक्ट झाली आणि मा. महासभेची मंजूरी मिळाली आणि प्रदुषण बोर्डांनी मान्यता दिली. जागेवर शिफ्ट व्हायचे असेल तर तिथेसुध्दा लॅन्डफिल लागणारच. कारण २१ टक्के जे पदार्थ येतात. कचरा येतो, कचऱ्यातून १९ टक्के......

**बर्नड डिमेलो :-**

सध्या काम चालु नाही करायचं. फक्त मंजूरी घेवून ठेवायची.

**मा. आयुक्त :-**

मंजूरी घेवून ठेवणार आणि प्लॅन्ट सुरु झाल्यानंतर ह्याची प्रक्रिया सुरु होणार.

**मा. सभापती :-**

आपण फक्त मंजुरी देवून ठेवतोय. काम चालु होणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्र पोल्युशन कन्ट्रोल बार्डने तुम्हाला मार्च २०१० पर्यंत वर्क ऑर्डर तुम्हाला इश्यु करायची आहे. अशी तुम्हाला सुचना केलेली आहे तर तुम्हाला ते करावच लागेल.

**मा. आयुक्त :-**

हो ते करणार ना. करावच लागेल.

**जुबेर इनामदार :-**

प्लॅन्ट सुरु करावे लागेल आणि हे तुम्हाला इश्यु करायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

दोन्ही करावे लागेल परंतु, तुम्हाला हे सांगतो की हे ॲग्रीमेंट करणार. ॲग्रीमेंट करुन वर्क ऑर्डर करणार. प्लॅन्ट सुरु झाल्यानंतर वर्क ऑर्डर देणार. त्याला पण गॅरेन्टी पाहिजे ना. त्याचे इन्व्हेस्टमेंट आहे.

**जुबेर इनामदार :-**

२०१० पर्यंत सुरु करायचे आहे. लॅन्डफिल साईट तयार झाली आहे. त्याच्यामुळे तुम्हाला महाराष्ट्र कंन्ट्रोल बोर्डाने स्पष्ट सुचना दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

महाराष्ट्र कंन्ट्रोल बोर्डाने नाही गव्हर्नमेंटने दिलेली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मंजूरीने आदेश आलेले आहे की, प्लॅन्ट सुरु करावे आणि या सगळ्या सुचना केलेल्या आहेत. त्याचे पालन करावे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, मला जरा एक स्पष्ट करा. हॅन्जर बायोटेक आहे तोच कॉन्ट्रॅक्टर आहे. ज्याचा प्रोजेक्ट आहे. तर मला सांगा की, तो का थांबेल. जर त्याला आपण मंजूरी दिली तिथे सुधारणा करण्यास.

**मा. आयुक्त :-**

त्याला कचराच गेला नाही तर तो कुठले लॅन्डफिल करणार?

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, आमचा विरोध नाही. शहरामध्ये कचरा होतो. आम्ही पण नागरिक आहोत आम्ही जबाबदार व्यक्ती आहोत. आम्ही विरोध करणं महापालिकेमध्ये येवून लोकांच्या नागरीकांच्या समस्या ऐकेन. तसच महापालिकेला सहकार्य करणं हे आमचे कर्तव्य आहे. पण याचा अर्थ हा नाही होत की, लोकांच्या नागरीकांच्या जिवाशी खोळायचं. आता जर लोकांना आवडत नाही. साहेब, तुम्हाला आम्ही समजू शकतो, तुम्हाला अडचणी आहेत. शहरातला कचरा कुठे न्यायचा. हा प्रश्न खुप मोठा आहे. पण सध्या आंदोलन चालु असताना आपण हा विषय आपणला मला तरी वाटते हे चुकीचे आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही शासनाच्या डायरेक्शन प्रमाणे आणि हायकोर्टाचे ऑर्डर आहेत. प्लॅन्ट चालू ठेवा.

**शरद पाटील :-**

साहेब, त्या ठेकेदाराने सांगितले होते की, ते जे व्हेस्टेज कचरा निघेल तर त्याचा बंदोबस्त मी करणार. मला मागील ठरावाची प्रत मिळावी एवढी मी विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

उद्या पाटील साहेब असं म्हणतील की, शहाड-टेमघर वरुन जवढ एम.एल.डी. आम्हाला मिळत तेवढीच एम.एम.डी. इथे मिळायला पाहिजे. तसे चालत नाही ना.

**बर्नड डिमेलो :-**

नाही चालत. पण हा फ्लॉप झालेला आहे. हन्जो बायोटेक आहे ना.

**मा. आयुक्त :-**

घनकचरा व्यवस्थापनामध्ये ओला कचरा सुखा कचरा या मधून जो पदार्थ जो बाहेर पडतात. खत तयार होवून आर.सी. ला जातो. प्लास्टीकचे लगदे होवून कंपनीला सगळी प्रक्रिया करुन झाल्यानंतर शिल्लक राहिलेले १९ टक्के राहतात. त्याच लॅन्डफिल साईट करायची आहे. लॅन्डफिल साईट ही त्यांच्या पुस्तकामध्ये पण आहे. आणि मा. महासभेच्या मंजूरीला पण लॅन्डबील साईट करावे लागेल. हे होते. त्याच आधारावर २००८ मध्ये हे टेंडर काढलेले आहे. म्हणजे मा. महासभेची मंजूरी २००८ ला आहे.

**जुबेर इनामदार :-**

शिंदे साहेब, ते मिनिस्ट्री ऑफ इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फॉरेस्टची जी नोटीफिकेशन आहे त्याची माहिती द्या ना. लॅन्डफिल साईट बद्दल. तर त्यातून वेस्ट निघणारच आहे. त्यामुळे लॅन्डफिल साईट हे करणे गरजेचे आहे. तो एक प्रोसेसचा भाग आहे.

**बर्नड डिमेलो :-**

प्रोसेस तर आहे. पण मी काय सांगतो की तो ठेकेदार फ्लॉप झालेला आहे. त्यांनी जी आश्वासन नगरसेवकांना मा. महासभेमध्ये दिली होती.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या मते फ्लॉप झालेला आहे.

**बर्नड डिमेलो :-**

तुमच्या मते नाही. सर्वांच्या मते फ्लॉप झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने आणि हायकोर्टाच्यावतीने प्लांटमध्ये काही दोष दाखवलेले नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मग, जागा चूकीची निवडली आणि ती लोकांना दाखवली अस असाव.

**मा. आयुक्त :-**

ते तुम्ही ठरवता. परंतु, गर्व्हमेंटने आदेश दिला प्लांट त्वरीत सुरु करावा. होयकोर्टाने आदेश दिला प्लांट त्वरीत सुरु करावा. तज्ञ कमिटी गेली. संस्थेचे, प्रदुषण बोर्डाचे आणि निर्या संस्थेचे, राकेश कुमार हे डायरेक्टर आहेत. त्यांनी तज्ञ कमिटीने फक्त सराउन्डींग सुचना सुचवली. प्लांटमध्ये काही दोष दाखवलेले

नाही. काहीही करुन तुम्हांला त्यांना दोष दाखवायचा आहे. कारण, तिथून हलवायचं आहे. परंतु, प्रत्यक्षात गर्व्हमेंटला......

**बर्नड डिमेलो :-**

माझे स्टेटमेंट आहे. जर दुर्गंधी हटत असेल तर आम्ही वेलकम करतो. मी या शब्दात म्हंटलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, प्लांटमध्ये काही दोष तर कमिटीने दाखवलेले नाही. तज्ञ कमिटीने प्लांटमध्ये दोष न दाखवल्यामुळे गर्व्हमेंटने बाहेर जे सुधारणा आहे. झाड लावणे कंपाउंड वॉलच्या बाजूला नाला काढून ते पाणी एकत्र आणणे, त्याचे फिल्टर करणे, कंपाउंड बांधणे आणि लॅन्डफिल साईट ह्या ज्या सुधारणा सुचवलेल्या आहेत. हे तज्ञ कमिटीने प्लांट सोडून सुचवलेले आहे.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, मी त्या तज्ञ कमिटीला दोष देत नाही. त्यांनी उपाय सुचवला आहे. जेणेकरुन लोकांना त्रास होवू नये आणि कारखाना चालू रहावा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, कारखान्यामध्ये दोष दाखवलेले नाही. त्यामुळे आपण जे म्हंटल प्लांट तो बरोबर चालवत नाही. असे जे म्हंटले ते तज्ञ कमिटीने सांगितल्यानंतर दुसऱ्यांना त्या प्लांटवर बोलण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, लोकांना त्रास होतो ना.

**मा. आयुक्त :-**

आता एम.डी. ने सांगितले की, हे ऑपरेशन करायला पाहिजे. तर तुला काय समजत की, ऑपरेशन करायचे नाही. असे आपण जावून म्हणू शकत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

तो प्रश्न त्या कमिटीचा झाला. पण परत वाद झाला, आंदोलन झाली तर त्यांना कोण समोर जाणार?

**मा. आयुक्त :-**

काही तरी वेगळ्या कारणासाठी आंदोलन असेल असे सगळ्यांचे म्हणणे आहे. माझे म्हणणे नाही.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, तुम्ही पण मानलेले आहे की, दुर्गंधी येत होती.

**हेलन गोविंद :-**

साहेब, सुरुवातीला एक दिड वर्ष लोक काहीच बोलली नव्हते. कारण, दुर्गंधी येत नव्हती. जेव्हा दुर्गंधी यायला लागली तेव्हा सगळे बोलले. कारण सकाळी चर्चमध्ये एवढा वास येतो. वाऱ्याने तो वास पसरतो ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, बरोबर आहे. तेव्हा लॅन्डफिल साईट तयार नव्हती. साचून राहत होते.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला तेच सांगायला लागलो. प्लान्ट मधला वास येत नव्हता. लॅन्डफिल साईट १९ टक्के जे शिल्लक राहतात ते लॅन्डफिल साईट डेव्हलप करायला सुरु झाल्यानंतर वास कमी होईल. त्यासाठी तज्ञ लोकांनी सुचवले. झाडं लावायला सांगितली. येणारे पाणी फिल्टर करुन वापरायला सांगितले. आणि लॅन्डफिल साईट सांगितली. डोंगरीच्या १००-१२५ लोकांना जो वास येतो तो बंद करण्यासाठीच हे सुचवलेले आहे.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, चार ही बाजूला ५०० मि. च्या परिसर पाहिजे. ती जागा त्यांच्याकडे कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

कुठली?

**बर्नड डिमेलो :-**

हा जो निचरा होईल त्याला आपण दलदल म्हणतो.

**मा. आयुक्त :-**

७० एकर जमीन आहे.

**बर्नड डिमेलो :-**

७० एकर नाही. त्यांनी पूर्ण कारखाना घातलेला आहे. तिथे मागे लोकांची शेती आहे.

**मा. आयुक्त :-**

ते पाणी जाणार नाही म्हणून कंपाउंड वॉल करुन हे करायला लावले.

**बर्नड डिमेलो :-**

डोंगराच्या उतारावरुन पाणी जाणार नाही असे होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

जाणारच नाही. आम्ही तशी व्यवस्था करणार आहोत आणि आयुष्यात कसली शेती केली नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, आयुष्यात शेती केली नाही हा शब्द चुकीचा आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आम्ही तपासून घेतलं, शेती अधिका-यांनी सायन्टीफिक मेथडने. काही प्रदुषण झालेले नाही असा रिपोर्ट आलेला आहे तो रिपोर्ट आम्ही गर्व्हमेंटला दिला. गर्व्हमेंटने त्यावर विश्वास ठेवला, त्यांना दाखवलं.

**बर्नड डिमेलो :-**

किती गेली असे नाही म्हणत. शेती करतात तर शेतीमध्ये जाईल.

**मा. आयुक्त :-**

गेली आणि शेती खराब झाली हा आरोप खोटा आहे म्हणून सिध्द केले ना, तपासून घेतले ना आणि पाणी तिथल्या बोरवेल आणि गावातले बोरवेल या दोन्ही पाण्याची तपासणी केली. काही फरक नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मग, काय आपण त्याची वाट बघायची असे तुम्ही म्हणता, खराब होईल त्याची.

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच या सुधारणा करतो ना. लॅन्डफिल साईट केले तर त्यात वास कमी होईल आणि पाणी गळती कमी होईल.

**बर्नड डिमेलो :-**

मी काय म्हणतो की, शहरामध्ये दोन-दोन केले, दोन्ही बाजूने कचरा झाला तर डिवाईड केला......

**मा. आयुक्त :-**

हा विचार तुम्ही पूर्वी २५-३० वर्ष ओपनवर कचरा टाकताना तिथे पण लोक राहतात. हा विचार कधी केला होता का? हे प्लांटच आहे तेव्हा तर लोकांनी ओपनवर वास घेतला. त्यांना त्रास होतो की नाही हा कधी विचार केला की नाही?

**प्रविण पाटील :-**

साहेब, लॅन्डफिल साईट तयार केल्यानंतर वास येणार नाही. याची गॅरेन्टी आहे का?

**मा. आयुक्त :-**

अहो कच-याचा प्लांट आहे. थोड्या प्रमाणात वास येणारच ना. आता अलिबागला आर.सी.एफ.चा कारखाना आहे. ५० वर्ष झाली. १०० गावांना वास येतो. तो खताचा प्लांट आहे, वास येणारच. न्यु बॉम्बेला आहे. परंतु, तो माणसाच्या शरिरावर इफेक्ट करणारा नाही.

**जुबेर इनामदार :-**

लॅन्डफिल साईट तयार नव्हते म्हणून त्यांचा जो वेस्ट होता ना.......

**मा. आयुक्त :-**

तो वास आहे ना तो शरीरावर इफेक्ट करणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

लॅन्डफिल साईट मधून त्याच्यावर प्लान्टेशन आहे, ह्याच्यामध्ये जे आर्थिक त्रुट्या होत्याना त्याला पूर्ण करण्याकरीता हा लॅन्डफिल साईट देत आहे.

**अनिल सावंत :-**

ते लॅन्डफिल साईट अजन व्हायला पाहिजे होते पण झाले नाही तर आता करुन घ्या.

**याकुब कुरेशी :-**

मी काय म्हणतो की, आता जर लॅन्डफिल साईट करुन हा प्रॉब्लम सुटत असेल तर मान्यता द्यायला कय हरकत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

काही हरकत नाही. पण मी एकच म्हणेन माझी सुचना घ्या. लॅन्डफिल साईट करुन जर हा प्रश्न सुटत असेल तर आम्ही मंजूरी देतो. अन्यथा तोच प्रकार चालू झाला तर महापालिकेने या सभेमध्ये आपण ठरावात लिहून घ्यावे. जर असा प्रकार घडला तर तो कारखाना बंद करावा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे ना. लॅन्डफिल साईट आणि भिंत बांधणार. भिंत १४-१५ फुटाची आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आहे त्याचे वर्डींग चुकीचे आहे. बांधा, वापरा, हस्तांतरीत करा तत्वावर प्रकल्पाच्या ठिकाणी असे करा.

**जुबेर इनामदार :-**

ठरावामध्ये सुधारणा करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सदर ठरावात विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात येत आहे. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११५ :-**

बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर लॅण्डफील साईट तयार करणेकामी प्राप्त निवीदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९६ :-**

महापालिका क्षेत्रात मौजे उत्तन येथे मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून प्राप्त जागेवर बांधा वापरा व हंस्तातरित करा या तत्वावर मे. हेंजर बायोटेक मिरा यांच्यातर्फ़े महापालिकेकरिता घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदरचा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मे २००८ पासुन कार्यान्वित झाला आहे.

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पुनःश्च तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने सुचविलेल्या सुचना व शिफ़ारशींची कार्यवाही करणेबाबत महापालिकेस कळविले आहे. महापालिका क्षेत्रात दैनदिन निर्माण होणा-या घनकच-यावर प्रकल्पात प्रक्रियेनंतर निघणारे १९% रिजेक्ट मटेरियलचे प्रमाण निश्चित केले आहे. त्यानुसार महापालिकेने घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातून निघणा-या १९% रिजेक्ट मटेरियलयची अंतिम विल्हेवाट लावणेकरिता घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार बांधा वापरा व हंस्तातरित करा या तत्वावर लॅंडफ़ील साईट तयार करणेकरिता निविदा मागविल्या होत्या. विहित मुदतीत तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी **मे. हेंजर बायोटेक मिरा** यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर दोन निविदाकारांनी निविदेत सादर केलेल्या दराच्या तुलनेत सर्वात कमी आहेत.

**मे. हेंजर बायोटेक मिरा** यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे. तसेच दर तीन वर्षांनी दरात १०% वाढ करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदन :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११६, मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता e-Tendering प्रणाली कार्यान्वित करणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब अजून ही १०० टक्के वेब साईट तयार झालेली नाही. त्याच्यावर लागणारी सुचना.

**मा. आयुक्त :-**

मोबाईलवर दाखवली ना.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यावर माहिती काहीच उपलब्ध नाही.

**मा. आयुक्त :-**

उपलब्ध नाही. फक्त टेंडर आल्यानंतर.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, फक्त टेंडरींग करीता तर नाही. सर्वच कामाकरीता आहे. टॅक्स करीता आहे, पाण्याच्या बिलाकरीता आहे. मागणारी बाकीची माहिती.

**याकुब कुरेशी :-**

ईस्टला हाताने पावत्या फाडतात. तिथे अजून कॉम्प्युटर लागलेले नाही.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, कॉम्प्युटर हे बंद होते. त्यासाठी मॅन्युअल बॅक-अप मध्ये पावत्या फाडत होते.

**याकुब कुरेशी :-**

म्हणून तुम्हांला सांगतो त्या व्यवस्थित सुधारणा करा ना.

**मा. आयुक्त :-**

व्यवस्थित सुधारणा करा.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, आपली बाकीची माहिती लोड का होत नाही. त्याचे कारण काय आहे?

**सिमा मिश्रा :-**

ई-टेंडरींग ही स्वतंत्र वेबलिंक तयार करुन देण्यात आलेली आहे. वेब साईट ही मेनली पब्लिक डिस्क्ल्युजर लॉ ची अंमलबजावणी तयार करण्याकरीता अपेक्षित होती आणि ई-टेंडरींग हे आम्ही स्वातंत्र वेब लिंक तयार करुन घेतलेली आहे. www.mbmc.abc.com त्याच्यावर आता आपण ई ऑप्शनमध्ये बाजार लिलाव पब्लिश केलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, आतापर्यंत कॉम्प्युटर वर जो खर्च केलेला आहे. मला वाटत कोट्यावधी रु. खर्च झालेला आहे आणि तरीसुध्दा महापालिकेमध्ये व्यवस्थितपणे ती योजना अजून राबत नाही किंवा सगळ्या वॉर्डमध्ये, प्रभागामध्ये आणि हे काय मध्येच घेवून आले मला काही कळत नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, आपले सन्मा. नगरसेवक श्री. मिलन पाटील हे हाय कोर्टात आरोग्याचे जे टेंडर आहे ते मा. महासभेच्या ठरावामध्ये घातले होते की, ई-टेंडरींग करावे आणि पेपरलाही द्यावे असे हाते. तेव्हा आपल्या ई-टेंडरींगची व्यवस्था नव्हती. म्हणून आपण पेपरला जाहिरात दिली ते जे जाहिरातीत देवून टेंडर आले ते ७६ आलेले आहे. जास्त प्रसिध्दीकरण झालेले आहे. आणि ७६ आलेले आहेत. परंतु, इथून पुढे एक ही टेंडर ई-टेंडरींग शिवाय करायचे नाही असा आदेश दिलेला आहे. त्यामुळे हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे ते ई-टेंडरींगचे करावे लागेल. ते बंधनकारक आहे. आणि त्यांनी आदेश दिला जर ते नाही केले तर कन्टेम्प्ट होईल. आणि ते म्हणतील यापुढे टेंडरींग करायचे आहे. आता जरी दोन पेपरला आले, ई-टेंडरींग मध्ये नाही आले तरीसुध्दा कोणीही हायकोर्टात जावू शकत.

**याकुब कुरेशी :-**

हे करु नका असे माझे म्हणणे नाही. हे करा, परंतु सगळं व्यवस्थित अगोदर जे केलेले आहे कम्प्युटराईज जे नगरपालिकेत एक खिडकी योजना वगैरे राबवण्याचे ठरवले होते, त्यावेळी आम्हाला किती तरी आश्वासन मिळाली आणि किती तरी त्याच्यावर भाषण झाली. वगैरे वगैरे. ते आजपर्यत झालेले नाही. या लोकांना कामावर ठेवलं त्याच्या तिकडे कॉम्प्युटरवरती. त्या लोकांना कॉम्प्युटर चालवत येत नव्हत. हा काय प्रकार आहे आणि हे किती वर्ष सहन करायचे. माझे म्हणणे एकच आहे की, सर्व एकत्रित करुन आणा. म्हणजे ते पण बाकी राहणार नाही. हायकोर्टाने आदेश दिले म्हणून ते करायचे आणि बाकीचे एवढे कोट्यावधी रुपये खर्च केलेला आहे त्याला असच पेन्डींग पाडून रहायचं. सगळं एकत्रित करावे मी तर हायकोर्टाला धन्यवाद देतो. फक्त हायकोर्टाने आणखिन थोडसं सांगितले असते की, सर्वच एकत्रित कम्प्युटराईज करा तर बरं झालं असतं.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, बाकीची माहिती जी लोड करायची शिल्लक आहे. त्याला कारण काय? बाकीच्या विभागाची माहिती तुम्हाला पूर्तता होत नाही का? किंवा तुम्हाला माहिती देत नाही असे काय आहे का?

**सिमा मिश्रा :-**

साहेब, माहिती कलेक्ट केली पण थोडसं अपूर्ण आहे.

**याकुब कुरेशी :-**

किती वर्ष झाली असतील, आम्ही नेहमी तेच ऐकतो अपूर्ण आहे, अपूर्ण आहे. अहो अपूर्ण काय आहे? ती का होत नाही? एवढा वेळा ठराव होतात, एवढा वेळा......

**शरद पाटील :-**

सगळं अपलोड असेल ना. ते आपल्यावर असेल ते आपल्याकडून घाईघाईने पाहिजे. जेव्हा तिथे येत तेव्हा कंन्टीन्यु कोर्ट बीट काही. सर्व बाजुला.

**याकुब कुरेशी :-**

गेली १७-१८ वर्षे झाली आम्ही सतत ओरडतो.

**अनिल सावंत :-**

दोन मिटींग पूर्वी मिरागावमध्ये मॅन्युअल रिसीट फाडल्या जातात. त्या ८ दिवसामध्ये कॉम्प्युटराझेशन होतील असं सांगण्यात आले. तर आता ८० दिवस झाले अजूनही मॅन्युअल फाडतात.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, ई-टेंडरींग राबवण्या करीता मी ८ दिवसांची वेळ दिलेली होती आणि सब कार्यालय आणि प्रभागीय कार्यालय जोडणी करीता, वॅन करिता सर्व्हे झालेला आहे. ते ई-टेंडरींग मार्फत त्याचे टेंडर मागवल्यानंतर आपल्या समोर ठेवण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

तुम्ही पावत्या कॉम्प्युटराईज का ठेवू शकत नाही.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, विभागीय कार्यालय खुप गावातल्या एरियामध्ये आहे. त्याचा आम्ही सर्व्हे करुन घेतलेला आहे.

**अनिल सावंत :-**

मिरागाव कुठे गावात येते. ते तर सिटीमध्ये येते. लाईट आहे, केबल आहे, सर्व आहे.

**याकुब कुरेशी :-**

गावाशी काय घेणं देणं. महानगरपालिका हद्दीत आहे ना.

**सिमा मिश्रा :-**

प्रथम टप्प्यात मिरारोड आणि भाईंदर ईस्ट, मुख्यालयशी वॅन आर.एफ. फिकवेन्सी द्वारा जोडण्यात आलेले होते. त्याला ४ वर्ष झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

मग, ही माहिती तुम्ही मागच्या वेळी जेव्हा ८ दिवसाची मुदत स्थायी समितीमध्ये घेतली त्यावेळी का नाही दिली?

**सिमा मिश्रा :-**

ई-टेंडरींग बद्दल मुदत दिलेली होती.

**अनिल सावंत :-**

ई-टेंडरींग, ई-टेंडरींग परत परत करतात. हॅन्ड रायटींगमध्ये आहे.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, तिथे संगणकच उपलब्ध नाही. त्याचे कार्यालय पण व्यवस्थित नाही. मिरागाव, एल.के.क्यु., राई, मुर्धा, विभागीय कार्यालय......

**याकुब कुरेशी :-**

एवढी श्रीमंत महानगरपालिका आणि ही अवस्था.

**अनिल सावंत :-**

तिथे बसायला जागा नाही.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, मिरारोडमध्ये एल.के.क्यु. चे कर भरणा करु शकतात.

**अनिल सावंत :-**

नाही घेत. सृष्टी परिसरवाल्यांना तिकडे प्रभाग कार्यालयामध्ये घेत नाही. मिरागांव मध्येच पाठवतात.

**मा. आयुक्त :-**

रसाजला पावत्या फाडतात.

**अनिल सावंत :-**

रसाजला तिकडचे घेत नाही. मिरागाव मध्येच आहे. सृष्टी सेक्टरमध्ये.....

**मा. आयुक्त :-**

तिथेच कनेक्ट करुन टाका.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक प्रभागाचे प्रत्येक प्रभागामध्येच घेतात.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, मिरारोडमध्ये मिरागावात जे बसलेले वसुली क्षेत्रिय अधिकारी आहेत त्यांच्याकडून हाती पावत्याने कर भरणा करण्यात येतो. नंतर त्याची मॅन्युअल पावती त्याच दिवशी २४ तासाच्या आत कॉम्प्युटरमध्ये अपडेट करायला पाहिजे अशी पध्दत आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही रसाज का डायव्हर्ट करत नाही.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, तेथे करभरणा आणि पाणी पुरवठ्याचा स्टाफ बसतो ना.

**मा. आयुक्त :-**

मग, त्याचं लोकांना घ्या. कार्यालयात बसवायचं ना.

**अनिल सावंत :-**

साहेब, त्यांना लांब पडेल ना. साहेब, मिरागाव, पेणकरपाडा ह्या लोकांना लांब पडेल ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, घरची पुरुष मंडळी कामाला जातात आणि बाई मंडळी टॅक्स भरायला जाते.

**मा. आयुक्त :-**

मग, रविवारी करु या.

**अनिल सावंत :-**

रविवारी कसं करणार? त्यांना रसाजला येईपर्यंत रिक्षाने ६० रु. लागतात. जायला ३० रु. यायला ३० रु. आणि आता तुम्ही वन वे केल्यामुळे जास्त लागतात.

**मा. आयुक्त :-**

हा प्रकार घडला होता, जिल्हा परिषदांची शाळा ताब्यात घेतली होती त्यावेळेला शाळा आणि शिक्षक आमच्या ताब्यात आले. ताब्यात आल्यानंतर सगळ्या शिक्षकांची लाईन लागली. मी इकडचा बाजूला राहतो, मला इथेच द्या. तिकडच्या बाजूला राहतो तिथेच द्या. रेल्वेमधून उतरल्यानंतर पुढची शाळा द्या.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, ते आपले नोकर आहेत.

**मा. आयुक्त :-**

मग, मी काय सांगितलं की, तुमचे घर मोठे असेल तर मी तिकडेच पाठवतो.

**अनिल सावंत :-**

मॅडम, मिरा भाईंदरची वेब साईट आहे ती फुल प्लेसमध्ये चालु आहे. इन ऑल रिस्पेक्ट.

**सिमा मिश्रा :-**

Web site is not full plate data wise infomatry purpose.

**अनिल सावंत :-**

Full plate working नाही आहे राईट.

**सिमा मिश्रा :-**

But you can view some of details which are been uploaded by us.

**अनिल सावंत :-**

तुम्हांला त्याच्यावर हायकोर्टाचे आदेश काय आहे?

**सिमा मिश्रा :-**

वेब साईट पूर्णपणे विकसित करावी. त्यासाठी आम्ही कार्यवाही चालु केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

त्यानंतर ई-टेंडरींग कराल. हायकोर्टाचा आदेश वाचा ना.

**सिमा मिश्रा :-**

Sir, E-Tendering is compalsary close and JNNURM also.

**अनिल सावंत :-**

हायकोर्टाचे आदेश आहेत ना. हायकोर्टाचे आदेश वाचा ना.

**सिमा मिश्रा :-**

The High court order is corporative will insured that is Web Site is functionill all respect us excesebal true different service providal.

**अनिल सावंत :-**

Web site is functionill in all full respect. झाली का?

**सिमा मिश्रा :-**

U can view. But some of the data is not uploaded.

**अनिल सावंत :-**

म्हणजे फुल फ्लॅट नाही ना ना.

**सिमा मिश्रा :-**

Data means water department.

**अनिल सावंत :-**

तुम्हांला कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट लागू होत नाही का?

**सिमा मिश्रा :-**

Law can tell…..

**जुबेर इनामदार :-**

लॉ ऑफीसरला विचारा.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, आणखीन एक महिती देवू इच्छीते, ई-गर्व्हनन्सची अंमलबजावणी करण्याकरीता नागरी सुविधा केंद्रला जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. त्यामध्ये ई-प्रॉक्युरमेंट किंवा ई-टेन्डरींग आपल्यावर कम्पलसरी आहे.

**अनिल सावंत :-**

मॅडम, आपण ई-टेन्डरींग करुया आणि करायलाच पाहिजे. त्याच्यावर तुम्हांला हायकोर्टाचे निर्देश दिलेले आहे. वेब साईट पूर्णपणे विकसित करुन ती पूर्णपणे विकसित झालेली आहे का?

**सिमा मिश्रा :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

मग ती पूर्णपणे विकसित करा आणि त्यावेळी विषय घेवून या.

**मा. सभापती :-**

विषय पुढे ढकलण्यात आलेला आहे.

**सिमा मिश्रा :-**

Sir, I will request. Pleace check the web site. www.mbmc.in. u can put u are command & letter ahead to our department.

**सई वडके :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. मी ऑर्डरचे काही मुद्दे वाचून दाखवते. We issue the following direction is a) Corporation will unsure that is web site is functional in all respect and excusable throe different service providers. b) In future in accordance with its resolution the notice in working tender should be put on it web site in as entirety and prolifically they should also been a position to receive the tender by annual mode. C) In future they will not issued advertisement inviting tenders only one news paper. We should be issue at least in two news paper one local & one national different languages. That is Marathi & English the web site should also be indicated by advertisement used in the news paper. हे डायरेक्शन दिलेले आहे. तर वेब साईटमध्ये जे काही इन ऑल रिस्पेक्ट फक्शनल झाले पाहिजे. Thrue different service provided I think so this is the one of the service provided.

**जुबेर इनामदार :-**

First the web site should be functionable this is your first clouse interpreting that language. It be legal now.

**सई वडके :-**

ह्याच्यामध्ये ऑर हा शब्द वापरलेला नाही. कोर्टाने ह्याच्यामध्ये ॲन्ड हा शब्द वापरलेला आहे. I agree, we have to read this order in entirety. आपल्याला ही ऑर्डर एकत्र वाचायची आहे. Corporattion will insured that is web site functional all respect.

**जुबेर इनामदार :-**

Is that corporation insuring its now.

**अनिल सावंत :-**

ते नाही म्हणून सांगितले.

**सिमा मिश्रा :-**

We are waking on rate. Sir, please check this www.mbmc.gov.in

**जुबेर इनामदार :-**

Madam, just give me one simple answer are you insuring the web site as in completely install.

**सिमा मिश्रा :-**

Yes.

**अनिल सावंत :-**

It is functionaling all respect.

**सिमा मिश्रा :-**

Only data information voice it is in complete.

**अनिल सावंत :-**

It is functional.

**सिमा मिश्रा :-**

We will make it functional

**अनिल सावंत :-**

You make it & then the bring subject. मा. सभापती साहेब, वेब साईट पूर्णपणे कन्क्शनल होवू दे. ऑल रिस्पेक्ट त्यानंतर विषय घेवून या. नाही तर आपल्यावर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होईल.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. मा. आयुक्त साहेब, तुम्ही आमच्याकडे हा जो ई-टेन्डरींगचा विषय आणलेला आहे. साहेब, हायकोर्टाचे निर्णय वगैरे सर्व ठिक आहे. आम्ही कुठे नाही बोलतो. पेपरमध्ये निविदा प्रसिध्द केली. ही निविदा आणण्याच्या अगोदर तृटी बघा. पूर्ण अभ्यास करुन हा विषय आणायला पाहिजे होता. मी ज्यावेळेला विषय घेतला होता. त्यावेळी मी मॅडमला बोललो होतो की, पूर्ण अभ्यासानिशी हा विषय घेवून या. साहेब, निविदा काढली. इसारा रक्कम ७५ हजार रु. कुठल्या आधारावर इसारा रक्कम ७५ हजार रु. ठरवली? कुठल्या आधारावर ७५ लाखाचं टेंडर काढले? वेब साईटवरती जाहिरात दिली नाही. दोन पेपरमध्ये दिली. काही ठेकेदारांना १७ फॉर्म दिले. काही ठेकेदारांना १२ फॉर्म दिले. १२ पेजचे, त्या ठेकेदारांची तक्रार मॅडम आपल्याकडे आलेली आहे का?

**सिमा मिश्रा :-**

आलेली आहे.

**मा. सभापती :-**

कुठल्या नगरसेवकांचे ई-टेन्डरींग बद्दल लेटर आपल्याकडे आलेले आहे का? सी.बी.आय. ची चौकशी करण्यात यावी या विषयाबद्दल.

**सिमा मिश्रा :-**

नाही.

**मा. सभापती :-**

कुठल्याही नगरसेवकाचे लेटर आपल्याकडे आलेले नाही.

**सिमा मिश्रा :-**

आमच्या विभागाकडे अप्राप्त आहे.

**मा. सभापती :-**

एका नगरसेविकेने आपल्याकडे लेटर दिलेले आहे की, सी.बी.आय. ची चौकशी संदर्भामध्ये.

**सिमा मिश्रा :-**

मा. आयुक्त साहेब, यांच्या मान्यतेने सामान्य प्रशासन विभागाला वर्ग करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :-**

ह्या त्रुट्या आहेत. आपण टेंडर दिल्यानंतर हे जे ई-टेंडरींगचे टेंडर आहे ना. हे निविदा किती प्रमाणात महानगरपालिकेच्या टोटल निघतात. त्याच्यावर ते निघतं. नोटीस काढल्यानंतर माहिती थोडी घेतली आणि ही माहिती आम्हाला फार अपूर्ण मिळालेली आहे. तुम्ही ह्याच्यामध्ये बघा. ही संपूर्णपणे चुकीची माहिती आहे. तुम्ही संपूर्ण सुपरव्हाईज आहेत. आरोग्याचे किती आहे, बघा. आम्हाला पूर्ण अपूर्ण माहिती दिली . आम्ही कशावरुन हे टेंडर ७५ लाखाच समजायचं.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येकांच्या दृष्टीवर अवलंबून आहे.

**मा. सभापती :-**

साहेब, आम्हाला अपूर्ण माहिती दिली. साहेब हे जे ॲग्रीमेंट आहे. ह्याच्यामध्ये ठेकेदार किती आले? आणि दोनच का? मग दोनच ठेकेदार आले तर आपण पुढे मुदत का वाढवली नाही. दोन ठेकेदार आले आणखिन ठेकेदार आले पाहिजे. मुदत का पुढे ढकलली नाही.

**याकुब कुरेशी :-**

पहिली गोष्ट अशी आहे की, कुठल्या टेंडर फॉर्ममध्ये १७ पेजेस आहेत तर कुठल्या टेंडर फॉर्ममध्ये १२ पेजेस आहेत म्हणजे एवढी मोठी चुक, याच्यावर का......

**सिमा मिश्रा :-**

व्यवस्थितरित्या आहे.

**मा. सभापती :-**

कारवाई होवू शकत नाही?

**याकुब कुरेशी :-**

यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

साहेब, तुम्ही आम्हाला समजून सांगणार. तुमचे अनेक उदा. आमच्याकडे येणार. साहेब, याच्यामध्ये थोडीशी माहिती आहे. अटीशर्ती तुम्ही आम्हाला इथे वाचून दाखवा ह्या अटीशर्ती एवढ्या जाचक ठेवलेल्या आहेत. तर त्या कशासाठी किंवा काय? अनेक टेंडर येवू द्या आम्ही मंजूरी देतो. इथे आम्ही त्याच्यासाठी बसलेलो आहे. या ठिकाणी अटीशर्ती वाचून दाखवा.

**मा. आयुक्त :-**

२६३ टेंडर फॉर्म दरवर्षी प्रसिध्द होतात. ह्या व्यवस्थित तुम्हाला काय माहिती पाहिजे.

**मा. सभापती :-**

साहेब, तुम्ही बघा. आम्हाला माहिती दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

काही लोकांना उपलब्ध नाही, म्हणजे आमचे टेंडरींग नाही म्हणून दिले.

**मा. सभापती :-**

आरोग्याचे नाही, वॉटर डिपार्टमेंटचे नाही.

**मा. आयुक्त :-**

दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

साहेब, निविदा काढल्यानंतर ही माहिती जमा केली. मी त्यावेळेला बोललो टोटल किती टेंडर निघतात? तर मला माहित नाही.

**सिमा मिश्रा :-**

मा. सभापती साहेब, कळवू इच्छितो की, मी दि. १७/११/२००९ रोजी सर्व विभागांना पत्र व्यवहार केलेला होता. ई-टेंडरींग राबवण्याकरीता आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे बाबत. काही विभागांनी दिले, काहींनी नाही दिले.

**मा. सभापती :-**

मॅडम ठिक आहे. तुम्हाला माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आम्ही म्हणतो, तुम्ही विषय पुढे घ्या. तुम्ही संपूर्ण माहिती जमा करा नंतर आमच्याकडे घेवून या.

**अनिल सावंत :-**

व्यवस्थित वेब साईट चालु करा.

**मा. सभापती :-**

वेब साईट वर निविदा द्या तुम्ही सगळी माहिती घेवूनच आमच्याकडे आणायचे होते. तुमच्याकडे माहिती आली नाही आणि तुम्ही आमच्याकडे अगोदर विषय घेवून येता.

**जुबेर इनामदार :-**

हायकोर्टाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करा.

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला बोलतो की, तुम्ही सगळी माहिती घेतली तर हा विषय घेवून या, अदरवाईज हा विषय आता मी घेत नाही. पुढे घेतो.

**चंद्रकांत मोदी :-**

एक महिने मिटींग पहले साहब आपने आदेश दिया था तो ८ दिन के अंदर वेब साईट चालु करेंगे ऐसा प्रॉमिस मॅडमने भी किया था। आपने आदेश दिया था की एक महिने के अंदर वेब साईट चालु हो जाएगी।

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, सी.एफ.सी. डिपार्टमेंटवर स्पेशल थोडं लक्ष द्यावं. सर्वांच्या तक्रारी आहेत. साहेब हा विषय आपल्याला आणायचा आहे. अटीशर्ती शिथील करा, फेर निविदा काढा. विषय चांगला येवू द्या, माहिती घ्या. हा विषय आपल्याला मंजूरच करायचा आहे आणि त्याचा अगोदर वेब साईटवर सुरु करावं.

**अनिल सावंत :-**

पहिले हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, हायकोर्टाच्या आदेशाला कोणी चॅलेंज केलेले नाही. तीच चुकीची आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही कसे चॅलेंज करणार?

**याकुब कुरेशी :-**

हे संपूर्ण आम्हाला माहित नव्हतं.

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टामध्ये केस झाल्यानंतर आम्ही केलेली कारवाई बरोबर आहे म्हणून गेल्यानंतर हायकोर्टाने ही ऑर्डर दिली आणि मा. महासभेने मुळात ठरवलेले आहे की, ई-टेन्डरींग करावे.

**मा. सभापती :-**

आम्हाला ई-टेंन्डरींग बद्दल सर्व माहिती अपूरी दिली आहे.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समिती म्हणजे पार्ट ॲन्ड पार्शल मा. महासभा.

**अनिल सावंत :-**

आम्ही कुठे म्हणतो की, ई-टेन्डरींग करु नका. ई-टेन्डरींग करा पण अगोदर हायकोर्टाचा जो निर्देश आहे तो फॉलो करा. वेब साईट पूर्णपणे विकसीत करा. त्यानंतर तुम्ही प्रस्ताव घेवून या आम्ही मान्यता देतो. स्वतः मॅडमने मान्य केले की, वेब साईट विकसीत नाही.

**जुबेर इनामदार :-**

हायकोर्टाचे आदेश स्पष्ट आहे. corporation will insured that us web site is functional in all respects आधी ती सुरु करा नंतर इन फ्युचर.

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ह्यांनी ऑर्डर आधी वाचली. एम.टी.एन.एल. मे बी वेब साईट आय.एस.पी. म्हणून काम करणार असा त्याचा अर्थ होतो. तुम्हाला आय.एस.पी. जर कुठला नेमायला असेल तर फक्त एकच नेमू शकतो.

**अनिल सावंत :-**

दुसऱ्या काही ऑर्डर असतील त्या फॉरगेट अबाउट दॅट. या ऑर्डरच्या हिशोबाने.

**याकुब कुरेशी :-**

आमचे म्हणणे एवढेच आहे. आम्ही एवढे वर्ष रडतो, ओरडतो तर ते अजून का होत नाही. कॉम्प्युटरायझेशन का होत नाही?

**अनिल सावंत :-**

ती विकसीत करा आणि प्रस्ताव घेवून या. तुम्हांला ह्या डेव्हलपमेंटचे मॅडमच माहिती देत नाही. पब्लिक जवळून काय माहिती मिळणार.

**जुबेर इनामदार :-**

ऑर्डरचे दोन क्लॉजेस आहेत. What is a saying corporation will insured that is web site functional is all respect. And closed to in future in ordinate with is resolution the notice inviting that a should be put on web site. जर तुमची web site incomplete आहे. How can insure. We very specific at clear on the subject the court is very clear it self.

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ज्यांचे आता टेंडर आलेले आहे. They provided a separate web link on their web site it self and…

**अनिल सावंत :-**

That your 100 % right. पण हायकोर्टाचा जो आदेश आहे……

**जुबेर इनामदार :-**

Why they are got comment it is your absulutaly right in words. By the high court.

**मा. आयुक्त :-**

हे बघा, जर हे मंजूर केले नाही तर बाहेरचे जे वेब साईट चालू आहे त्यावर मी ई-टेन्डरींगचे प्रत्येक टेंडर देणार.

**अनिल सावंत :-**

तुमच्या अधिकारात तुम्ही द्या ना.

**जुबेर इनामदार :-**

जर तुमच्या अधिकारात असेल तर करुन घ्या आमची मान्यता नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब, आमचा ई-टेन्डरींगला विरोध नाही.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, त्याच्यासाठी आमचा विरोध नाही. टेंडर चूकीच्या पध्दतीने जाते. हायकोर्टाच्या….

**अनिल सावंत :-**

हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावण होत नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११६ हे पुढे ढकलण्यात येत आहे आणि सदर विषय सविस्तर घेवून या.

**जुबेर इनामदार :-**

हायकोर्टाची दिलेल्या निर्देशाप्रमाणे पूर्ण वेब साईट कन्क्शनल आहे की नाही त्याला insure केल्यानंतरच पूढे करा.

(मा. सभापती सो. यांच्या आदेशाने सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११७, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र ११७ अवलोकन सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, मला एक विचारायचे आहे. महागनर गॅस एम.जी.डी. आणि रिलायन्स एनर्जी त्यांनी आता काम केलेले आहे. तिथे रस्ते अर्धवट सोडलेले आहे. त्यांनी रस्ते बुजवलेले नाही. महानगर गॅस आणि रिलायन्स एनर्जीवाल्यांनी ज्या रस्त्याचे खोदकाम केलेले आहे. दिवाबत्ती खांबे लावण्यात आलेले आहे आणि गॅसचे लाईन जोडणी करण्यात आलेली आहे. तर त्यांनी काय केलेले आहे की, त्यांनी संपूर्ण रस्ते त्याच अवस्थेत सोडून गेलेले आहेत. आणि ते नगारे घेवून जातात आणि माती तशीच टाकून जातात. तर त्यांना विचारणा केली असता तर ते सांगतात आम्ही नगरपालिकेचे भाडे भरतो

**मा. आयुक्त :-**

खड्डा केलेला आहे तर ते दुरुस्त कधी होणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, कुठल्या रस्ता?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सेक्टर नंबर ५.

**मा. आयुक्त :-**
साहेब, खोदाई करुन किती दिवस झाले?
**चंद्रकांत म्हात्रे :-**
आता सध्या काम चालूच आहे.
**मा. आयुक्त :-**
७-८ दिवसात खोदाई सुरु झाली असेल.
**अनिल सावंत :-**
साहेब, महिना झाला. १०० फुट रोड पण घ्या.
**मा. आयुक्त :-**
जिथे जिथे खोदाई झाली असेल तिथे दुरुस्त करुन टाका.
**मदन उदितनारायण सिंह :-**
मा. आयुक्त साहेब, जेसलपार्क चौपाटीपर गोखले साहबने पत्रा निकाला तो वह पत्रा वापस लग गया। लास्ट मिटींग मे भाडा सबकुछ लग गया लेकीन वापस पत्रा लग गया।
**मा. आयुक्त :-**
हमने पत्रा दिया नही।
**मदन उदितनारायण सिंह :-**
लेकीन उधर फिर भी पत्रा लगा है।
**जुबेर इनामदार :-**
मा. आयुक्त साहेब, इथे अधिकाऱ्यांना आदेश देतात त्याची अंमलबजावणी झाली की नाही? ह्याची एक आढावा बैठक घ्या.
**मा. आयुक्त :-**
ज्यांनी पत्रा लावला त्याच्यावर एम.आर.टी.पी. दाखल करा.
**प्रविण पाटील :-**
साहेब, आमच्याकडचे पण एक अतिक्रमण काढलेले. ते परत बांधले.
**गणेश पाटील :-**
मी सकाळी कारवाई करुन आलो तेव्हा नव्हते.
**प्रविण पाटील :-**
दूपारी बांधले.
**अनिल सावंत :-**
मा. आयुक्त साहेब, मागच्या मिटींगमध्ये आउट स्टॅन्डीग सेसबद्दल रिपोर्ट देणार होते. पुढच्या मिटींगला सेस आउट स्टॅन्डींग आहे आणि त्याची रिकवरी त्याच्या बद्दल डीटेल रिपोर्ट येणार होता. स्टॅन्डींग कमिटीला तर तो रिपोर्ट रेडी आहे का?
**मा. आयुक्त :-**
नरेंद्र चव्हाण वसुली किती झाली?
**नरेंद्र चव्हाण :-**
१ कोटी ५२ लाख रु. वसुल झाले.
**अनिल सावंत :-**
आता आउट स्टॅन्डींग किती आहे?
**मा. आयुक्त :-**
आता ४-५ दिवसात ४-५ कोटी रु. ची वसुली होईल.
**नरेंद्र चव्हाण :-**
साडे दहा कोटी रु. वसुली बाकी आहे.
**अनिल सावंत :-**
साडे दहा कोटी रु. अजून १२ कोटी रु. द्यायचे आहे.
**प्रकरण क्र. ११७ :-**
मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)
**ठराव क्र. ९७ :-**
मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मुर्धा खाडी, बामणदेव नगर, सदानंद नगर परिसरातील गटारे दुरुस्ती करणे व | रु. ९,९८,५००/- | में. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | | | |
| २ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३७ येथे ट्रेझा व्हिला बिल्डींग समोर क्रॉस ड्रेन बांधणे. लेपोरा स्ट्रीट येथे गटार तयार करणे व विविध गल्ल्यांमधील सी.सी. रस्ते तयार करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९९,५००/- | मे. एस.एम. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नर्मदा महादेव गार्डन येथील इमारतीच्या भिंती लगतची रेलींग काढून दुसऱ्या बाजूस बसविणे व दुरुस्ती कामे करणे. | रु. ४८,५००/- | मे. साळवी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | राई यशवंत मास्तर रोड लगतच्या शौचालयाची पाण्याची टाकी बसविणे. | रु. ९,०००/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (पूर्व) सर्व्हे नं. २०९ मधील मैदानाच्या संरक्षणाकरीता कुंपणभिंत बांधणे. | रु. ९,१४,९००/- | मे. तिरुपती मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ६ | भाईंदर (पूर्व) अभिनव अभियांत्रिकी कॉलेज मागून साईकृपा रस्त्यापर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ६,०६,४००/- | मे. ओमजयशंकर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | मिरारोड येथील पुनम पॅराडाईज अंबर आकार समोर गटार बांधणे व स्लॅब टाकणे. | रु. ९,९७,३००/- | मे. शिवकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) साठी अरिहंत टॉवर मधील मनपाच्या जागेतील १ ला मजला येथे फर्निचरचे काम करणे. | रु. १०,००,०००/- | मे. तिरुपती मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ९ | मिरारोड वॉर्ड क्र. ५० मधील अस्मिन अपार्टमेंट ते मिरा स्मृती अपा. पर्यंत गटारावरती स्लॅब टाकणे. | रु. ७,२२,५४०/- | मे. अक्षय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १० | मिरारोड येथील हॉस्पीटल समोरील गटारावर पेव्हर ब्लॉक व कर्बस्टोन बसविणे. | रु. ९,९९,९००/- | मे. अनंत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ११ | भाईंदर (पूर्व) जेसलपार्क चौपाटी येथे बांधलेल्या धक्क्याच्या व उद्यानाच्या संरक्षणाकरीता रेलिंग बसविणे. | रु. ७,०८,१००/- | मे. डहाणू रोड मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.डहाणू जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १२ | भाईंदर (प.) नाझरेथ झोपडपट्टी येथे राजेश माछी ते उघाडी पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे. | रु. २,५५,९००/- | मे. नवलाई रोड मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १३ | उत्तन कुंभारवाडा येथील ब्रायन घर ते पोलिस चौकी व समोरील इतर गल्ल्या अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. ९,२०,०००/- | मे. अनंत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १४ | मिरारोड वॉर्ड क्र. ५४ मधील एन.जी. हेरिटेज ते अस्मिता आर्चिड ३ गटारावर स्लॅब टाकणे. | रु. ८,५८,४००/- | मे. वज्रेश्वरी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. पालघर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १५ | भाईंदर उत्तन रोडवरील मुर्धा ते राई मोर्वा या भागातील रस्त्याच्या कडेला माती भराव करणे. | रु. ५,०५,०००/- | मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १६ | भाईंदर राई यशवंत मास्तर रोड शौचालया समोरील गटार बांधणे | रु. ६०,५००/- | मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | |
| १७ | भाईंदर (पूर्व) नवघर येथील नवघर जुना सर्व्हे क्र. २०९ (शासकिय जागा) तारेचे कुंपण घालणे. | रु. २,७५,२००/- | मे. नवजीवन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १८ | मिरारोड वॉर्ड क्र. ५४ मधील आयडीयल टॉवर ते ओसवाल पॅराडाईज पर्यंत गटारावर स्लॅब टाकणे. | रु. ५,०८,२५०/- | मे. बावघर विभाग मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १९ | मिरारोड वॉर्ड क्र. ५४ कृष्णा टॉवर गोल्डन पॅलेस ते ओम पॅराडाईज गटारावर स्लॅब टाकणे. | रु. २,९१,८००/- | मे. अंबिका मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २० | मिरारोड वॉर्ड क्र. ५० मधील अस्मिन अपा. ते हुमा अपा. पर्यंत गटाराचे रुंदीकरण करणे व स्लॅब टाकणे. | रु. ७,१०,४००/- | मे. दुर्गा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २१ | भाईंदर (पूर्व) अभिनव शाळा नवीन इमारती मागील असलेल्या गटारावरील मेनहोल कव्हर्सची उंची वाढवून तयार करणे. | रु. २,०४,०००/- | मे. समर्थकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २२ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ येथे सिध्दार्थ को.ऑ. सोसायटीच्या व चंद्रलोक अपार्टमेंटच्या मागील गटाराचे उर्वरीत काम करणे. | रु. ५,३६,६००- | मे. दुर्गा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २३ | भाईंदर (प.) गणेश देवल नगर कमलेश नगर, पेणकर पाडा, मिरारोड (पूर्व) से.०५ इत्यादी ठिकाणाचे स्ट्रीट लाईट पोल शिफ्टींग करणे. | रु. २,२५,५४८/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २४ | दाचकुल पाडा, चेना, जनता नगर, परशुरामवाडी पाली, उत्तन इत्यादी ठिकाणची अंगणवाडी व साईबाब नगर व्यायामशाळा येथे विद्युत फिटींग करणे. | रु. २,९०,८६५/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २५ | भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल परिसरातील शवागृहात विद्युत फिटींग करणे. | रु. ३,४९,५०४/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २६ | मिरारोड (पूर्व) येथे विविध ठिकाणी Decorative pole लावणे. | रु. ५,१६,६९२/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २७ | जनता नगर येथील सावित्रीबाई फुले येथे प्लंम्बींग व विद्युत फिटींग करणे. | रु. ३,००,०००/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य कार्यालय इमारतीमध्ये नागरी सुविधा केंद्रात २० KVA क्षमतेचे Online UPS पुरवठा करणे. | रु. ५,९७,०००/- | मे. बालाजी एक्झीम | अंदाजपत्रकिय दराने |
| Sr. No | Description | Per/Unit | Rate | Amount |
| 1 | Supplying and Installation of 20 KVA on Line UPS at CFC Head office Building Bhayandar (w.) in MBMC Area. | 1 | 601000 | 601000 |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सृष्टी व सुर्या शॉपींग सेंटर येथे (Blinker) बसविणे. | रु. २,४२,६००/- | मे. युटीलिटी इंटरप्रायजेस | |

| Sr. No | Item | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | 12 V led Retrofit Lamphad | 06 | 5200 | 31200 |
| 2 | Supply of Policabonet Housing 300 mm dia Bilnker lamphad body assembly aspect | 06 | 2650 | 15900 |
| 3 | Elecronic solar charge cum controller | 05 | 6750 | 33750 |
| 4 | 12 V – 37 watts solar panel | | 15000 | 75000 |
| 5 | Erection of Bilnker poll in 6 mtr with 1:1:5:3 cement concrere and providing copies of 30 cm dia in cc plastering finishing and curing | 05 | 4000 | 20000 |
| 6 | Junction Box for solar charger and battery pole mounting type including installation charges | 05 | 8000 | 40000 |
| 7 | 3 inch GI poll 6 mtr | 05 | 5000 | 25000 |
| 8 | Wiring and testing of one binker lamphad | 06 | 250 | 1500 |
| | | | | **242350** |
| ३० | राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वरील नील कमल जंक्शन यंथील सिग्नल यंत्रणा दुरुस्ती करणे. | रु. १,८८,६६०/- | मे. युटीलिटी इंटरप्रायजेस | |
| Sr. No | Item | Qty | Rate | Amount |
| 1 | Underground Cable 14 core x 1.5 sq.mm | 350 | 210 | 73500 |
| 2 | Underground Cable 14 core x 1.5 sq.mm to be peplace whenever fault accurs | 31 | 210 | 6510 |
| 3 | 4” RCC pipe | 40 | 500 | 20000 |
| 4 | Special cable joint kit | 10 | 1500 | 15000 |
| 5 | Pole removal and creaction | 04 | 2500 | 10000 |
| 6 | Signal aspect removal and erection | 15 | 250 | 3750 |
| 7 | Writing testing on one signal lamphad | 15 | 200 | 3000 |
| 8 | Control box removal and creaction | 01 | 6000 | 6000 |
| 9 | Cown-down timer | 01 | 14800 | 14800 |
| 10 | Repairing of microprocessor based controller by replacing microprocessor card and out put card | 01 | 30000 | 30000 |
| 11 | Installation charges | -- | 6000 | 6000 |
| | | | | **188560** |

वरील पैकी अ.क्र. १ ते ३० या कामाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडल्याबद्दल सर्व सदस्यांचे आणि अधिका-यांचे मी आभार मानतो आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करतो. धन्यवाद.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**